# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३३ | बुधवार, दि.२४ जुलै २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# मुसळधार सुरुच; आठ मंडळांमध्ये अतिवृष्टी

## देवरी,गोरेगाव व अर्जुनीने गाठली सरासरी, जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट, संजय सरोवर, पुजारीटोला,सिरपुर धरणाचे दरवाजे उघडले



**गोंदिया:** शुक्रवारपासून (दि.१९) बरसत असलेल्या दमदार पावसाने अद्याप उसंत घेतली नसून मंगळारी (दि.२३) पाचव्या दिवशीही पावसाचा जोर कायम होता. या पावसामुळे जिल्ह्यातील देवरी व अर्जुनी मोरगाव तालुक्यात परत एकदा अतिवृष्टीची नोंद घेण्यात आली. तर देवरी, अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी तालुक्यातील एकूण आठ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. पावसामुळे जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून, असे असतानाच हवामान खात्याने जिल्ह्याला सोमवारी ऑरेंज अॅलर्ट दिला होता.

जिल्ह्यात जुलै महिना अर्धा लोटूनही पावसाने जोर दाखविला नसल्याने सर्वांच्याच नजरा आकाशाकडे लागून होत्या. शेतांमध्ये पाणी साचून नसल्याने बहुतांश शेतकऱ्यांची रोवणी अडकून पडली होती. तर दुसरीकडे उकाडा कमी न झाल्याने सर्वसामान्य हैराण झाले होते. सर्वांनाच पावसाची गरज असतानाच शुक्रवारी (दि.१९) पावसाने जिल्ह्यात एंट्री मारली व जिल्ह्याला पार धुवून काढण्यास सुरुवात केली. शुक्रवारी रात्रभर व शनिवारी सकाळपर्यंत बरसलेल्या पावसामुळे शनिवारी पाच तालुक्यात अतिवृष्टी झाली होती. तर शुक्रवारपासून पावसाची संततधार सुरुच असून यामुळेच सोमवारी (दि.२२) जिल्ह्यातील देवरी व अर्जुनी मोरगाव तालुक्यात परत एकदा अतिवृष्टीची नोंद घेण्यात आली आहे.

मंगळवारी देवरी तालुक्यात ४५७ मिमी पाऊस बसरला असून अर्जुनी मोरगाव तालुक्यात तब्बल ९४.४ मिमी पाऊस बरसला आहे. विशेष म्हणजे २३ जुलैपर्यंत देवरी तालुक्यात ५२०.४ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच येथे ७०० मिमी पाऊस बरसला आहे. तर अर्जुनी मोरगाव तालुक्यात ५८९.८ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच ८४६.९ मिमी पाऊस बसरला आहे. तर गोरेगाव तालुक्यात ४२७.० मिमी पाऊस अपेक्षित असतानाच ४४८.६ मिमी पाऊस बरसला आहे. म्हणजेच या तीन तालुक्यांनी अपेक्षित सरासरी गाठल्याचे दिसून येत आहे.

### प्रमुख धरणातील पाणीसाठा (टक्के)

| | |
|---|---|
| इटियाडोह | ९८.१७ टक्के |
| सिरपुर | ७०.०१ टक्के |
| कालीसरार | २६.१५ टक्के |
| पुजारीटोला | ७१.०५ टक्के |

### अर्जुनी मोरगावचे तोडला मागील वर्षीचा रेकॉर्ड

**यंदा वरुणराजा अर्जुनी मोरगाव तालुक्यावर जास्त मेहरबान दिसून येत आहे. कारण यंदा आतापर्यंत सर्वाधिक ७५२.५ मिमी पाऊस अर्जुनी मोरगाव तालुक्यात बरसला आहे. त्यातच विशेष म्हणजे, अर्जुनी मोरगाव तालुक्याने मागील वर्षीचा रेकॉर्डही मोडून काढला आहे. मागील वर्षी तालुक्यात ६२४.२ मिमी म्हणजेच १०८.७ मिमी पाऊस बरसला होता. तर यंदा आतापर्यंत ७५२.५ मिमी म्हणजेच १३१ मिमी पाऊस बरसला आहे.**







### या आठ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद

**सोमवारी जिल्ह्यातील देवरी व अर्जुनी मोरगाव या दोन तालुक्यात अतिवृष्टीची नोंद घेण्यात आली आहे. यामध्ये देवरी तालुक्यातील दोन, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पाच तर सडक अर्जुनी तालुक्यात सडक अर्जुनी मंडळात अतिवृष्टी झाली आहे. पावसाच्या आकडेवारीनिहाय बघितल्यास देवरी तालुक्यातील चिचगड मंडळात सर्वाधिक २९५.५ मिमी पाऊस बरसला आहे. तर सिदीबिरी मंडळात ११३ मिमी पावसाची नोंद घेण्यात आली आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध मंडळात १०५.८ मिमी, महागाव मंडळात १६१.३ मिमी, केशोरी मंडळात १६१.३ मिमी, तर गोठणगाव मंडळातही १६१.३ मिमी पाऊस बरसला आहे. याशिवाय सडक अर्जुनी तालुक्यात सडक अर्जुनी मंडळातच ९९.३ मिमी पावसाची नोंद घेण्यात आली आहे.**

### १२० घरांची पडझड

**जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे १२० घरे व ३० गोठ्यांची पडझड झाली आहे. तर ११ जनावरे वाहून गेल्याने पशुपालकांचे नुकसान झाले. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास नुकसानीच्या आकडेवारीत वाढ होण्याची शक्यता आहे.**

### पावसाने भरुन काढली तूट

**जिल्ह्यात आतापर्यंत अपेक्षित पावसापेक्षा कित्येक कमी प्रमाणात पाऊस बरसला होता व यामुळेच तूट निर्माण झाली होती. मात्र, शुक्रवारपासून सुरु असलेल्या संततधार पावसामुळे ही तूट भरुन निघाल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात २३जुलैपर्यंत सरासरी ५००.६ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच आतापर्यंत ५५०.७ मिमी पाऊस बरसला आहे. यामुळेच जिल्हा आता जलमय झाला आहे.**

# नवेगावबांध जलाशय ओव्हरफ्लो

**गोंदिया:** जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाचा जोर मंगळवारी(दि.२२) पाचव्या दिवशीही कायम होता.संततधार पावसामुळे जिल्ह्यातील नदी-नाल्यांना पूर आला असून आठ ते दहा मार्ग अद्यापही बंद आहेत. संततधार पावसामुळे नवेगावबांध जलाशय ओव्हरफ्लो झाला असून इटियाडोह धरणातील पाणीसाठा ९५.५ टक्क्यांवर पोहोचला असून, तोसुद्धा रात्रीपर्यंत ओव्हरफ्लो होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने पूजारीटोला धरणाचे १४, सिरपुर धरणाचे ६ आणि संजय सरोवर धरणाचा १ दरवाजा सोमवारी सकाळी उघडण्यात आला. पावसाची रिपरिप अशीच कायम राहिल्यास जिल्ह्यात पूर परिस्थितीत वाढ होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे.

तब्बल दीड महिना उसंत घेतलेल्या पावसाने शुक्रवारी रात्रीपासून हजेरी लावली. शनिवारी, रविवारीसुद्धा जिल्ह्यात सर्वत्र पावसाने दमदार हजेरी लावली. तर मंगळवारी पाचव्या दिवशीदेखील जिल्ह्यातील काही भागांत पावसाचा जोर कायम होता. संततधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील खोडदा-वडेगाव बंध्या, दिनकरनगर, केशोरी, केशोरी-वडसा, केशोरी-चिचोली मार्ग अर्जुनी मोरगाव-महागाव, म्हसगाव-इसापूर-कोरंबीटोला, महागाव-बोरी, बोरी-मांडोखाल हे मार्ग बंद झाले होते. तर देवरी तालुक्यातील तीन-चार मार्ग बंद झाले होते. तीन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाचा जोर अजूनही काही भागांत कायम आहे. त्यामुळे धरणाच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नवेगावबांध जलाशय ओव्हरफ्लो झाला असून, इटियाडोह धरणाच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत असल्याने हे धरणसुद्धा रात्रीपर्यंत ओव्हरफ्लो होण्याची शक्यता कर्तविली जात आहे.



### धरणातून पाण्यचा विसर्ग वाढला

**संततधार पावसामुळे सोमवारी सकाळी पुजारीटोला धरणाचे १४ दरवाजे ०.३० मीटरने उघडण्यात आले असून त्यातून १२३ क्यूमेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तर सिरपुर धरणाचे ६ दरवाजे ०.३० मीटरने उघडण्यात आले असून त्यातून १४३.४१५ क्यूमेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तर मध्य प्रदेशातील संजय सरोवर धरणाचा १ दरवाजा २ मीटरने उघडण्यात आला असून त्यातून १९१ क्यूमेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास व धरणाचे दरवाजे आणखी उघडण्यात येणार असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने कळविले आहे.**

### या गावांना सतर्कतेचा इशारा

**जलाशयातील पाणीसाठा १२ फुटांवर पोहोचला आहे. नवेगावबांध जलाशय ओव्हरफ्लो झालेला असून या जलाशयाशेजारील कोहळीटोली,येलोडी, जांभळी, रामपुरी, रांजीटोला या गावाच्या शेजारी नवेगावबांध जलाशयाचे पाणी पोहोचले आहे. सतर्कतेचा इशारा म्हणून कोहळीटोलावासी यांनी कोहलगावकडे, बोंडेवासीयांनी नवेगावबांधकडे आणि पांढरवाणी येथील नागरिकांनी रयतवाडी परसोडीकडे प्रसंगावधान राखून आसारा घ्यावा असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने कळविले आहे.**

### नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असल्याने आणि धरणातील पाणीपातळीत वाढ झाल्याने पुजारीटोला, सिरपुरबांध, संजय सरोवर धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. तर नवेगावबांध जलाशय ओव्हरफ्लो झाला असून इटियाडोह प्रकल्पसुद्धा ओव्हरफ्लो होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. पूर प्रवण क्षेत्रातील १५ गावांनासुद्धा जिल्हा प्रशासनाने अलर्ट दिला आहे.**

# १६ शिक्षकांची मान्यता रद्द

## संस्थाचालकांना दणका; बनावट पत्राच्या आधारे भरतीची तपासणी अंतिम टप्प्यात

**गोंदिया :** गोंदिया जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी सुनील मांढरे यांनी २०१७-२०मध्ये दिलेली १६ शिक्षकांच्या भरतीची मान्यता रद्द करण्यात आली आहे. पुण्याच्या शिक्षण सहसंचालकांनी हे आदेश दिले आहेत. यानिमित्ताने नियमबाह्य शिक्षक भरतीचा मुद्दा नव्याने चर्चेला आला आहे.

राज्य सरकारने २ मे २०१२ला शिक्षक भरतीवर बंदी घातली होती. गरज पडल्यास काही विशिष्ट अटींच्या अधीन राहून भरतीला परवानगी देण्यात येणार होती. मात्र अटींची



कुठलीही पूर्तता न करता गोंदिया जिल्ह्यातील ५३ शाळांमध्ये शिक्षक भरती करण्यात आल्याच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण संचालकांकडे या तक्रारी झाल्या होत्या. विशेष चौकशी समिती नेमून घोटाळ्याचा पर्दाफाश करण्याची मागणी माजी शिक्षक आमदार नागो गाणार, विदर्भ शिक्षक संघ, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघासह अनेक संघटनांनी केली. या घोटाळ्यातून शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर महिन्याला दीड कोटी रुपयांचा खर्च होत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला होता. चौकशीनंतर २०२१ मध्ये नागपूरच्या शिक्षण उपसंचालकांनी ५२ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द केल्या होत्या. ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. आता तीन वर्षांनी परत १६ शिक्षकांवर कार्यवाही करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास मंत्रालयातून व्हावा यासाठी नागो गाणार यांच्यासह विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आवाज उठविला होता.

यात सहाय्यक शिक्षक विनोद हेमराज जगणे, जी. एम. हरिणखेडे (सेजगाव हायस्कूल), एम. पी. समरित, एस. पी. डोंगरे (गणेश हायस्कूल गुमधावडा), निशा विजयसिंग नागपुरे (एसएसपीडी हायस्कूल म्हसगाव), दीपिका गुलाब दमाहे (स्वामी विवेकानंद हायस्कूल सोनपुरी), कमलेश शालिकराम ठाकूर, संजय ग्यानीराम बिरनवार (हरिदास भवरजार गणखेरा), महेश शिवसागर बडोले, ममता जगतलाल अम्बुले (फुलीचंद भगत हायस्कूल कोसमतोडी), अनिता प्रेमलाल मेंढे, हिमांशी युगल मोहन (परशुराम विद्यालय मोहगाव), शालू धनराज कोटांगले, प्रियंका मुखरू शामकुळे (अमृताबेन पटेल हायस्कूल रिसामा), स्मिता प्रमोद कटरे (डॉ. आंबेडकर माध्यमिक विद्यालय सरकारटोला) आदींचा समावेश आहे.

### नेमके काय घडले?

**चौकशीनंतर नागपूरच्या शिक्षण उपसंचालकांनी शिक्षकांच्या या नियुक्तीसंदर्भातील मान्यता रद्द केल्या होत्या. याविरोधात कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. शिक्षण उपसंचालकांनी मान्यता रद्द करताना संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस न दिल्यामुळे त्यांचे आदेश रद्द करून महिनाभरात शिक्षण सहसंचालकांनी सुनावणी घ्यावी, असे आदेश पारित केले. महिनाभरात सुनावणी न घेतल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित सुरू करावे, असेदेखील आदेश दिले. मुदतीच्या आत सुनावणी न घेण्यात आल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आदेश दिले गेले. मात्र १ जुलैला शिक्षण सहसंचालकांनी नागपूरच्या शिक्षण उपसंचालकांचे आदेश कायम ठेवून सर्व सोळा शिक्षकांच्या मान्यता रद्द केल्या.**

# बरडटोलीची शाळा भरते समाज मंदिरात



**अर्जुनी मोरगाव:** गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यात पावसाची संततधार सुरु आहे. अनेक रस्ते जलमय झालेले आहेत. बरडटोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तीन दिवसांपासून कंबरेवर पाणी साचलेले आहे. वर्गखोल्यात पाणी भरले आहे. साहित्याची नासधून झाली आहे. वर्गात जाणे कठिण झाले आहे. सोमवारी विद्यार्थी समाज मंदिरात बसून शिक्षणाचे धडे घेत आहेत.

बरडटोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक ते चार वर्ग असून ३७ विद्यार्थी अध्ययन करीत आहेत. शाळेच्या पाठीमागे इटियाडोह धरणाचा मुख्य कालवा आहे. कालवा व शाळेची आवारभिंत यादरम्यान मोठा खड्डा आहे. कालव्याच्या झिरपणामुळे हा खड्डा भरतो.

आवारभिंतीच्या खाली असलेल्या पोकळीतून पाणी शिरुन ते शालेय परिसरात साचून राहते. याशिवाय उतार भाग असल्याने शाळेच्या पटांगणात बाहेरील पाणीसुद्धा येऊन जमा होते. शाळेची इमारत कमी उंचीची असल्याने लवकरच वर्गखोल्यात पाणी शिरते. पूर्ण क्षमतेने कालव्यातून धरणाचे पाणी वाहत असल्यास व त्याचवेळी काहीशी पर्यन्यवृष्टी असल्यास शाळेच्या सभोवताल पाणी जमा होते.

### तर सुटू शकतो पाणी साचण्याचा प्रश्न

**शाळेच्या पाठीमागे साचून असलेल्या पाण्याला वाट तयार करुन दिल्यास काहीसा हा प्रश्न सुटू शकतो. गतवर्षी हा प्रश्न उद्भवला असता नगरसेवक राधेश्याम भेंडारकर यांनी पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता राऊत यांना समस्या सांगितली. त्यावेळी खड्ड्यातील पाण्याला वाट मोकळी करुन देण्यात आली व तात्पुरता हा प्रश्न सुटला होता. एकतर साचणाऱ्या खड्ड्यातील पाण्याला वाट तयार करुन पाण्याचा निचरा करणे किंवा नवीन इमारतीचे बांधकाम केल्याशिवाय ही परिस्थिती कायमस्वरूपी सुटणार नाही. उद्भवरणाऱ्या अशा प्रसंगाची माहिती शालेय प्रशासनाला वेळोवेळी दिली जाते. मात्र या गंभीर बाबींकडे सातत्याने कानाडोळा केला जातो. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.**

## २६ जुलैला कारगिल विजय दिवस व सैनिक मेळाव्याचे आयोजन

**गोंदिया :** कारगिल विजय दिवस व सैनिक मेळावा असा संयुक्त कार्यक्रम जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण समितीचे अध्यक्ष प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली २६ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालया अंतर्गत असलेल्या कल्याणकारी सुविधा व अन्य सुविधांबाबत विस्तृत माहिती देण्यात येईल तसेच माजी सैनिकांच्या कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा तक्रारी असल्यास त्याचे निराकरण करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमात स्टेट बँक ऑफ इंडिया येथील प्रतिनिधीद्वारे माजी सैनिकांना डीएसपी अकाऊंट अंतर्गत असलेल्या सुविधा बद्दल मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच मातृभूमी माजी सैनिक बहुउद्देशीय संस्था पुणे यांचेद्वारे सैन्यदलात अधिकारी पदाकरीता प्रवेश घेणे आणि युपीएससी परीक्षेची तयारी करण्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तरी या कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येनी माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीर पत्नी, वीर माता यांनी उपस्थित राहून सैनिक मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मानसी पाटील यांनी केले आहे.

# लोकार्पण होण्यापुर्वीच शशीकरण घाटातील उड्डाणपुलाला पडले भगदाड

## बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह, अपघाताची शक्यता बळावली

**देवरी:** वन्यप्राण्यांच्या अधिवासामुळे राष्ट्रीय महामार्ग ५३ वर तयार करण्या आलेल्या उड्डाणपुलाचे लोकार्पण होण्यापुर्वीच मोठे भगदाड पडल्याने उड्डाणपुलाचे बांधकाम करणाऱ्या अग्रवाल ग्लोबल कंपनीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील शशीकरण घाटाजवळ उड्डाणपुल तयार करण्यात आले असून, या पुलावरुन वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे. परंतु पुलाच्या एका बाजूला मोठे भगदाड पडल्याने तो मार्ग बंद करण्यात आला आहे. पुलावरील दुसरा मार्ग सुरु करण्यात आला असून एकेरी मार्गावरुन दोन्ही बाजूने वाहतुक सुरु आहे. वन्यजीवाच्या रक्षणाकरिता वन्यजीव क्षेत्रात शिरपुर ते साकोली (मोह-घाट) पर्यंत अग्रवाल ग्लोबल कंपनीला चार उड्डाणपुल तयार करण्याचे कंत्राट मिळाले आहे. याअंतर्गत मोहघाटा, शिरपुर शशीकरण घाटातील पुलाचे काम पूर्ण झाल्याने या पुलावरुन लोकार्पण होण्यापुर्वीच वाहतूक सुरु करण्यात आली आहे. परंतु शशीकरण घाटातील पुलावर मोठे भगदाड पडल्याने वाहतुकीला धोका निर्माण झाल्याने कंपनीने हा मार्ग बंद केला आहे.



### बांधकामावर प्रश्नचिन्ह

लोकार्पण होण्यापुर्वीच पुलावर मोठमोठे खड्डे पडले आहे. त्यामुळे कंपनीच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. संबंधित विभागाने याची दखल घेऊन या बांधकामाची चौकशी करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# ओबीसी विद्यार्थी वसतिगृहांचा ताबा घेणार!

## प्रवेश दिला जात नसल्याने विद्यार्थी संघटना आक्रमण

**नागपूर:** ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करण्याच्या अनेकदा घोषणा करण्यात आल्या. २०२४-२५ शैक्षणिक सत्रास प्रारंभही झाला तरी या वसतिगृहांमध्ये प्रवेश दिला जात नसल्याने विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असून १ ऑगस्टला वसतिगृहांचा ताबा घेण्याचा इशारा दिला आहे.

यावर्षीपासून राज्यात इतर बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागासवर्ग, भटके विमुक्त व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे सुरु करण्यात येत आहेत. राज्य सरकार गेल्या चार वर्षांपासून वसतिगृह सुरु करण्यात येतील असे अनेकदा सांगत आहे. परंतु कंत्राटदाराकडून फर्निचर उपलब्ध होत नसल्याने वसतिगृह सुरु झालेले नाहीत. परिणामी, ओबीसी आणि विद्यार्थी संघटना संतप्त झाल्या आहेत. त्यांनी सोमवारी सहायक संचालकाची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले.

ओबीसी विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. वसतिगृहासाठी आवश्यक फर्निचरची आणि खाणावळीची व्यवस्था नाही. त्यामुळे चालू शैक्षणिक सत्रात देखील ओबीसी विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध होतील की नाही याबाबत शंका आहे, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सरचिटणीस सचिन राजूरकर म्हणाले. नागपूर जिल्ह्यात १ ऑगस्ट २०२४ पासून वसतिगृह सुरु करण्याचे नियोजन होते. परंतु प्रशासकीय अडचणीमुळे ते होऊ शकले नाही, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक राजेंद्र भुजाडे यांनी दिली.



**ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी १५ ऑगस्ट २०२३ पासून वसतिगृह सुरु करण्याची घोषणा विधानसभेत केली होती. पण वर्षभरनंतरही वसतिगृह सुरु झाले नाहीत. येत्या ३१ जुलैपासून वसतिगृह सुरु न केल्यास विद्यार्थी १ ऑगस्टला वसतिगृहाचा ताबा घेतील.**

**उमेश कोर्राम, अध्यक्ष, स्टुडंट्स राइट्स असोसिएशन ऑफ इंडिया**

**कंत्राटदारांकडून वसतिगृहांना फर्निचर पुरवठा करण्यात येत आहे. १५ दिवसात वसतिगृह सुरु करण्यात येतील. वसतिगृहात खानावळ सुरु करण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येईल.**

**अतुल सावे, मंत्री, इतर बहुजन कल्याण**




साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.२४ जुलै २०२४ २

## संपादकीय

### शिक्षणाची नवी दिशा-नवी संकल्पना-कौशल्य विद्यापीठ

कौशल्य विद्यापीठांची संकल्पना अलीकडच्या काळातली आहे. नुकतीच काही राज्यांनी यांची स्थापना केली आहे. हरियाणा, दिल्ली, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, आसाम यांसारख्या राज्यात ही विद्यापीठं आहेत. कौशल्य प्रशिक्षण हे या पूर्वी २००८ ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय कौशल विकास निगमद्वारे प्रमाणपत्र व अनेक योजनांद्वारे मनुष्यबळ विकसित करीत होते. सेक्टर स्किल कॉउंसिलसची ही स्थापना करण्यात आली. यात अनेक उद्योग क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता व प्रमाणपत्रावर आधारित अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली. पदवी व पदव्युत्तरची जोड नसल्याने हे कौशल्य प्रशिक्षित युवक व युवतींना साधे अभ्यासक्रम किंवा दूरशिक्षण प्रणालीद्वारे पदवी घेत होते. कौशल्यावर आधारित पदवी व पदव्युत्तरची संकल्पना कौशल्य विद्यापीठाद्वारे आणण्याचा उत्तम प्रयत्न केंद्र शासनाने केला आहे. नॅशनल करीक्युलम फ्रमेवर्क यात कौशल्यावर आधारित व पारंपरिक विद्यापीठद्वारे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांचे क्रेडिट फ्रेमवर्क दिलेली आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही कौशल्यावर भर देण्यात आला आहे. कौशल्य विद्यापीठात ४०% क्लासरूम व ६०% स्किलवर आधारित अभ्यासक्रम देण्याची संकल्पना आहे

राज्य शासनाने स्थापित केलेले कौशल्य विद्यापीठ हे राज्यव्यापी विद्यापीठ असणे अपेक्षित आहे. राज्य विधेयकातून यांची निर्मिती झाली आहे. हरियाणातील विश्वकर्मा कौशल्य विश्वविद्यालय याची निर्मिती २०१६ ला झाली. जवळजवळ सहा वर्षांनी मागच्या वर्षी इमारतीचे बांधकाम दुधोला पालवल येथे झाले. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची २०२२, आसाम स्किल युनिव्हर्सिटीची स्थापना २०२०, गुजरात स्किल युनिव्हर्सिटी २०२१, दि राजस्थान युनिव्हर्सिटी २०१७, दिल्ली स्किल्स युनिव्हर्सिटी २०२० ची स्थापना झाली आहे. त्याच धर्तीवर देशात अनेक इतर राज्यांनी कौशल्य विद्यापीठाची घोषणा केली आहे.

दिल्ली स्किल्स युनिव्हर्सिटी यांनी ब्राऊन फ्रील्ड पद्धतींनी दिल्लीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय डिप्लोमा कॉलेजेसचा विद्यापीठात समावेश करून घेतला. इथे तांत्रिकी शिक्षणाबरोबरच इतर कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम देण्यात येत आहे. असल्या मूलभूत सुविधांचा उपयोग करून या विद्यापीठांनी कार्य आरंभ केला आहे. राजस्थानच्या कौशल्य विद्यापीठ यांनी महाविद्यालयांना संलग्नता दिली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू केले आहे. अभ्यासक्रम तयार करणे, लॅबोरेटरी, वर्ग खोल्या, प्राध्यापक, भौतिक सुखसुविधा, अभ्यास मंडळाची स्थापना, विद्यापरिषदेची स्थापना व कौशल्य विद्यापीठाला लागणारे उद्योग जगाशी निगडित ऑन द जॉब ट्रेनिंग इतर नियामक मंडळाची स्थापना करणे, परीक्षा विभागाची स्थापना, परीक्षा मंडळ, फ्री समिती, परिनियम अशा अनेक बाजू विद्यापीठाच्या स्थापनेपासून करणे आवश्यक होते. ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट असलेल्या महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, गुजरात इथे स्थित विद्यापीठ किमान ५ वर्षांत म्हणजे एक चार वर्षाची बॅच बाहेर पडल्यावर त्याचे प्रभाव सगळ्या पर्यंत पोहोचतील.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात २१ अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. उद्योग समूहांबरोबर ५५ करार केले असून सगळ्या अभ्यासक्रमात उद्योग समूह विद्यार्थ्यांना ऑन द जॉब ट्रेनिंग देणार आहे. टाटा ट्रेंट, मॅकडोनाल्ड, मेट्रोपोलीस, केपीएमजी, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स, वर्ल्ड ट्रेड सेन्टर सारख्या कंपन्यांचाच संस्थांचा समावेश आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात डिझाईन थिंकिंगवर भर देण्यात आला आहे. विद्यापीठांनी या वर्षी युरोपच्या नामवंत डिझाईन संस्था रुबिकबरोबर करार करून जागतिक दर्जाचा बीडीईएस इंडस्ट्रियल डिझाईन, इनटरॅशनल डिझाईन अशा कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्ससाठी एनएसडीसी इंटरनॅशनल बरोबर करार केला असून जपानी, जर्मन या भाषेचे कौशल्य प्रशिक्षण येथे देण्यात येत आहे. प्रशिक्षित विद्यार्थ्यांना त्या देशांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याचे कार्य या केंद्राद्वारे करण्यात येणार आहे.

सध्या इथे १०० प्रशिक्षणार्थी भाषेचे कौशल्य प्राप्त करता आहेत. मेकॅट्रॉनिक्स, सिव्हिल ॲण्ड कॉन्संट्रेशन मॅनेजमेण्ट, कॉम्पुटर टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सारखे पदवी अभ्यासक्रम चालू केले आहेत. यात प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या वर्षी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून या वर्षी पूर्ण संख्येत विद्यार्थी प्रवेश घेतील. विद्यापीठांनी सेंट्रल युनिव्हर्सिटी एन्ट्रान्स टेस्टद्वारा विद्यार्थी घेणार असून इतर राज्यव्यापी, शासकीय देशव्यापी प्रवेश परीक्षेचे स्कोर असलेले विद्यार्थी पण प्रवेश घेऊ शकतील. विद्यापीठांनी ख–स्पार्क फाऊंडेशनची स्थापना केली आहे व यात नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, मेन्टॉरिंग करणे, सीड फंड देणे इत्यादी काम चालू आहे. हे विद्याविहारला स्थित असून काही नवसंशोधन संशोधक करणारे इथे कार्यरत आहेत. विद्यापीठांनी २० महाविद्यालयांत प्री इनक्युबेशन केंद्रांची स्थापना केली असून १०० नवसंशोधकांनी आपले प्रस्ताव विद्यापीठात सादर केले आहेत.

ठाण्यात संत गाडगेबाबा स्वच्छता अकादमीची निर्मिती विद्यापीठांनी केली असून बीबीए फॅसिलिटी मॅर्नेजमेण्ट व इतर सर्टिफिकेट कोर्सेस भारत विकास ग्रुप या कंपनीबरोबर करार करून देण्यात येत आहेत. ३ महिन्यांत ३०० लाभार्थींनी याचा उपयोग केला असून त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे. विद्यापीठाचे बिग डेटा, आर्टिफिसिअल इंटेलेन्स, सायबर सिक्युरिटीवर आधारित एमटेक कोर्सेसला चांगला प्रतिसाद आहे. कौशल्य विद्यापीठ हे पारंपरिक विद्यापीठांना पूरक असून कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात क्रेडिट ॲवॉर्ड करू शकतात. आरपीएलच्या माध्यमानातून विद्यापीठचे उद्योग क्षेत्रात काम चालू केलेले आहे. विद्यापीठ हे १००% नवीन शैक्षणिक धो–रणावर आधारित असून विद्यापीठाने प्रोफेसर–ऑफ –प्रॅक्टिस नेमले आहेत. नुकताच विद्यापीठाचा आकृतीबंद शासनाने मान्य केला असून प्राध्यापकांची नेमणुकेचे काम चालू होईल.

जशी म्हण आहे “रोमची निर्मिती एका दिवसात झाली नव्हती’ तसेच विद्यापीठाचे निर्माण करण्यात काही वर्षं लागतात. कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याचा भारताचं नव्हे तर जगभरतील पहिला प्रयोग आहे. भारताने कौशल्य क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे व कौशल्य विद्यापीठ हे जगभर भारतीय मनुष्यबळ देण्यात सहभागी होतील. काळाच्या गरजेनुसार शिक्षणात बदल होणे अपेक्षित आहे. कौशल्य विद्यापीठ हे अप्लाइड युनिव्हर्सिटी या धरतीवर बदल घडवतील. आज वर्ल्ड स्किल डेच्या निमित्याने या नावीन्यपूर्ण विद्यापीठाची संकल्पना यशस्वी होईल व भारत हे खऱ्या अर्थाने जगभर कौशल्य मनुष्यबळ देईल यात शंका नाही.

**प्रा. डॉ. अपूर्वा पालकर**, कुलगुरू महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

## नाल्यावर १० लाख खर्चूनही शाळेत पाणी



**गोंदिया:** रस्त्यावरील पाणी नगर परिषदेच्या शाळेत शिरु नये, यासाठी गेल्या वर्षी १० लाख निधीतून नाली बांधकाम करण्यात आले. मात्र नाली बांधकाम झाल्यावरही शाळेत पाणी शिरत असल्याने बांधकामाच्या नियोजनाचा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

शहरातील छोटा गोंदिया परिसरात नगर परिषद संचालित प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा आहे. या शाळेत दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यावरील पाणी तसेच समोर अस–लेला तलाव ओव्हरफ्लो झाल्यास ते पाणी शिरत असल्याने विद्यार्थी व शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे शाळेसमोर नाला तयार करण्याची मागणीने जोर धरला होता. अखेरीच मागील वर्षी नाला बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला व नाला बांधकाम करण्यात आले. मात्र परिस्थिती ‘जैसे थे’ असल्याने यंदाही रस्त्यावरील पावसाचे पाणी शाळेतील वर्गखोल्यात शिरत आहे. त्यामुळे या बांधकामाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. याकडे स्थानिक आमदार व नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

## भारतीय संविधानाचे गौरवशाली ७५ वर्षनिमित्त जिल्ह्यात “हर घर संविधान” जागृती उपक्रम



**गोंदिया:–** भारतीय संविधानाचे गौरवशाली ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त भारतीय संविधानाचे अमृत महोत्सव “हर घर संविधान” जागृती अभियान जिल्हास्तरावर राबविण्यासाठी उपक्रम आयोजन नियोजन संबंधी चर्चा बैठक आषाढी गुर पौर्णिमेच्या दिवशी शासकीय विश्राम गृह येथे आयोजित करण्यात आली. या प्रसंगी भारतीय संविधानाच्या गौरवशाली ७५ व्या वर्षात आम्ही पदार्पण केलेला आहे. संविधान मैत्री संघ व सर्वसामाजिक मित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात ८ ही तालुक्यात हर घर संविधान जागृती अभियान जिल्ह्यात दोन टप्प्यात राबविण्याचे ठरले, पहिल्या टप्प्यात १५ ऑगस्ट ते २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत तर दुसऱ्या टप्प्यात २६ नोव्हेंबर २०२४ ते २६ जानेवारी २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

या पहिल्या टप्प्यात संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षेचे आयोजन रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ ला करण्यात येणार आहे. ०१ ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबर हा काळ शालेय परीक्षा, सण उत्सव सुट्ट्या व निवडणुकीचा काळ राहणार असल्याने २९ सप्टेंबर २०२४ ही सर्वांना सोयीस्कर असणारी तारीख ठविण्यात आली. १८ वर्षाच्या आतील ज्युनिअर व १८ वर्षांवरील सिनियर या दोन गटात आयोजित या परीक्षेत १.५ (दीड) लाखाचे ५० नगद व ५० प्रोत्साहन बक्षिसं स्मृती चिन्ह, प्रमाणपत्रासह जिल्ह्यातील ८ तालुक्यात समान स्वरूपात प्रदान करण्यात येईल.

या बैठक प्रसंगी संविधान जागृती अभियान समन्वयक प्रा. डॉ दिशा गेडाम, मराठी माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष घनश्याम पटले, विदर्भ ज्युनिअर कॉलेज टीचर्स असोसियेशन (विज्युक्टा) चे अध्यक्ष प्रा.पोमेंद्र कटरे, प्राचार्य रोमेंद्र बोरकर, आदेश गणवीर, अनिल गोंडाणे, मनोजकुमार बनसोड, केशवराव देशमुख, विद्यार्थिनी हंसा बावनकर, या रश्मी येसनसुरे, स्नेहा मेश्राम, श्रुती ठाकरे, गुंजन काढेवार, नीलाक्षी हिरापुरे, आराधना उके, जान्हवी भोंडेकर, पंचशिला पान–तावणे, अतुल सतदेवे व इतर संविधान मित्र प्रामुख्याने उपस्थित होते.संचालन संविधान मैत्री संघाचे संयोजक अतुल सतदेवे तर उपस्थितांचे आभार सहसंयोजक आदेश गणवीर यांनी मानले.

## डेंगू, हिवताप व किटकजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करा-जिल्हाधिकारी

**गोंदिया** : पावसाळा सुरु असल्यामुळे शहरातील नाल्या सद्यस्थितीत तुंबलेल्या आढळून येत असल्यामुळे नाल्यांमध्ये डासांची उत्पत्ती जास्त प्रमाणात होत आहे. सर्वत्र पाणी साचून किटकजन्य आजार वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे शहरातील नाल्या व इतर डासोत्पत्ती स्थाने वाहती करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी नगरपरिषद व नगरपंचायत प्रशासनाला दिल्या.

अशा करा उपाययोजना : नगर परिषद कार्यक्षेत्रातील नाल्या/गटारांची साफसफाई नियमीत करुन पाणी तुंबणार नाही याची दक्षता घ्यावी. टायर्स विक्रेते, भंगार विक्रेते यांच्यामुळे किटकजन्य आजारांच्या उद्रेकाला हातभार लागत असल्याने सा–थरोग नियंत्रण अधिसूचनेनूसार कायदेशिर कार्यवाही करावी. निरुपयोगी प्लास्टिकच्या वस्तूंची विल्हेवाट लावावी. सर्व शौचालयाचे (खाजगी व सार्वजनिक) व्हेंट पाईपला जाळ्या किंवा कापड बांधण्याची मोहिम राबविण्यात यावी. बांधकाम होत असलेल्या परिसरात पाणी साचून डासोत्पत्ती होणार नाही याबाबत संबंधितांना सूचना द्यावे. नगर परिषद कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी व सार्वजनिक निरुपयोगी विहिरीमध्ये गप्पी मासे सोडण्याची धडक मोहिम राबविण्यात यावी.




केंद्र शासनाने डेंग्यू हा आजार अधिसूचित (नोटीफायेबल) आजार घोषित केला असल्यामुळे कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालयात उपचारीत होणाऱ्या संशयीत डेंग्यू रुग्णांची माहिती नगर प्रशासनाला व आरोग्य विभागाला देणेबाबत आपले स्तरावरुन सूचित करावे. रिकाम्या भूखंडावर कचरा व पाणी साचले जाणार नाही याची दक्षता घ्यावी. किटकजन्य आजार नियंत्रणाकरीता आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळण्याबाबत नगर परिषद प्रशासनातर्फ्रे जनजागृती करण्यात यावी. नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सर्व हॉटेल्स व चहा विक्रेते यांच्या दुकानात पाण्याकरीता ठेवण्यात येणाऱ्या साठ्यामध्ये डासांच्या अळ्या तयार होण्याची शक्यता असल्याने त्यांना नगर परिषदेतर्फ्रे पाण्याचे साठे झाकून ठेवण्याबाबत व त्याची योग्य निगा राखण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात यावे.

जनावरांना पाणी पिण्यासाठी शहरात तयार करण्यात आ–लेले कृत्रिम पाणवठे पावसाळयात सुद्धा पाण्याने भरलेले असतात. त्यामुळे या पाणवठ्यांमध्ये डासांच्या अळया तयार होण्याची शक्यता असल्याने त्यांना नगर परिषदेतर्फे पाण्याचे साठे झाकून ठेवण्याबाबत व त्याची योग्य निगा राखण्याबाबत सूचना देण्यात यावे. पाण्याच्या साठयांमध्ये तयार होणाऱ्या डासांच्या अळया नष्ट करण्याकरीता टेमिफॉस अळीनाशक हे नगर परिषदेतर्फे खरेदी करुन ठेवण्यात यावे. नगर परिषद कर्मचाऱ्यांकडून नियमित डास अळी सर्वेक्षण करण्यात यावे. धूर फवारणीकरीता नगर परिषदेकडून सायफॉनोथ्रीन किटकनाशक खरेदी करुन कार्यक्षेत्रात नियमित धूरफवारणी करण्यात यावी. कार्यक्षेत्रात शो–षखड्डे तयार करण्यात यावे तसेच फुटलेल्या पाईपलाईनची व गळतीची त्वरित दुरुस्ती करावी.

शाळेतील विद्यार्थ्यांमाफ्र्‍त प्रभातफेरी काढावी तसेच प्रार्थनेच्या वेळी डेंग्यू, हिवताप व किटकजन्य आजाराविषयी माहिती देवून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची जनजागृती करण्यात यावी. याकरीता संबंधीत तालुका आरोग्य अधिकारी यांचेशी समन्वय साधावा. मच्छरदान्यांचा वापर करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी. गावातील शेणखताचे उकिरडे व कचऱ्याचे ढिगारे हे लोकवस्तीपासून लांब अंतरावर ठेवण्याबाबत कार्यवाही करावी. नगर परिषद कार्यक्षेत्रातील घराच्या परिसरात नळाच्या पाण्याकरीता बांधण्यात आलेल्या सिमेंटच्या भूमिगत टाक्यात डासांच्या अळया तयार होणार नाही याची खबरदारी घ्यावी. नगर परिषद कार्यक्षेत्रात योग्य दाबाने पिण्याचे पाणीपुरवठा होईल याबाबत कार्यवाही करावी, जेणेकरुन भूमिगत टाके नागरिक तयार करणार नाहीत. कार्यक्षेत्रातील किटकजन्य आजाराचे उद्रेक व मृत्यू होणार नाहीत याबाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

## पक्ष मजबूतीसाठी आणि नागरिकांच्या हितासाठी केलेल्या कामांची माहिती द्या-आमदार विनोद अग्रवाल



**गोंदिया :** महाराष्ट्रात येत्या तीन महिन्यांत विधानसभा निवडणुका होणार असून त्यासंदर्भात जनता की पार्टी (चाबी संघटना) च्या विशेष पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गोंदिया येथील जलाराम लॉन येथे आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीत आमदार विनोद अग्रवाल यांनी आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कामाला लागण्याचे आवाहन केले.

गोंदिया विधानसभेत गेल्या पाच वर्षात झालेली विकासकामे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शहरात/गावातील नागरिक व लाभार्थ्यांच्या वैयक्तिक भेटीगाठींमुळे पक्ष मजबूत होईल. गेल्या पाच वर्षांत आम्ही अनेक निवडणुका लढल्या आणि जिंकल्या. आम्ही सरकारी योजना प्रभावीपणे राबवल्या. गोंदिया शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत, ही बाब प्रत्येक घराघरात पोहोचवून अधिकारी व कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवावी, असे आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

बैठकीमध्ये प्रामुख्याने भाउराव उके, मुनेश रहांगडाले, छत्रपाल तुरकर, कशिश जायसवाल, चैतालीसिंह नागपुरे, इंजी समीर आरेकर, प्रभाकर ढोमने, लखन हरिनखेड़े, चेतन बहेकार, जितेश टेंभरे जीतलाल पाचे, रामराज खरे, दिलीपसिंह मुन्डेले,कमलेश सोनवाने, परसराम हुमे, मोहन गौतम, बाबा चौधरी, ज्ञानचंद जमईवार, शेखर सहारे, विक्की बघेले, सुधीर चंद्रिकापुरे, फिरोज बंसोड, शैलजाताई सोनवाने, जितेश्वरी रहांगडाले, मंजू डोंगरे, सनम कोल्हाटकर, शालिकराम हरिनखेड़े इत्यादि कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## हवालदाराने गोरेगाव पोलीस ठाण्यातच केले विष प्राशन

**गोंदिया:** गोरेगाव येथील पो–लीस ठाण्यातील कार्यरत हवालदार राजेश जौंजाळ (बक्कल नंबर ९३५) यांनी पोलीस ठाण्यातच विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना १९ जुलै रोजी रात्री उघडकीस आली. घटनेच्या दिवशी राजेश जौंजाळ पोलीस ठाण्यातील खोलीत कार्यरत होते.

यावेळी राजेशने कीटकनाशक प्राशन केले. हा प्रकार इतर पोलीस सहकाऱ्यांच्या निदर्शनास येताच एकच खळबळ उडाली. त्यांना तातडीने गोरे–गाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. येथून प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना गोंदियाला हलवण्यात आले. त्यांच्यावर गोंदिया येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आत्महत्येच्या प्रयत्नामागील कारण अद्याप समजू शकले नाही

## जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

**गोंदिया::** सध्या सेतू कार्यालय किंवा जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही कागदपत्रे अनिवार्य असल्याने विद्यार्थ्यांची धाकधुक वाढली आहे. अश–ातच मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेतली जाते. मात्र, प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणं अनिवार्य आहे. विविध समाज घटकातील विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अनेक महिने लागतात, त्यामुळे प्रमाणपत्र सादर करण्यावर सूट देण्याची मागणी होत होती. याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतला. सन २०२४–२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याच निर्णय घेण्यात आला आहे.

सरकारच्या या निर्णयाचा विद्यार्थ्यांना विशेषत: मराठा समाजातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणा?्या अडचणीही दूर होणार असल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे.

मराठा कुणबी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्रास होत असून काही अधिकारी विद्यार्थ्यांना त्रास देत असल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. लाडकी बहिण योजनेमुळेही प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अडचणी येत असल्याचं काही विद्यार्थ्यांनी सांगितलं होतं. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा दिलासादायक निर्णय घेतला. त्यामुळे आता जातवैधता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक थांबणार आहे.

## सत्यशोधक विधीवत गृहप्रवेश



अन्न, वस्त्र व निवारा ह्या माणसाच्या मूलभूत गरजा समजल्या जातात. त्यामुळे आयुष्यात स्वतःचं घर असावं ही ओढ जीवनात लागलेली असणे खूप स्वाभाविक आहे. म्हणूनच घर बांधले की घराचं स्वप्न पूर्ण झालं असं म्हणतात. आमचे मित्र कपिल थुटे हेही याला अपवाद राहिलेले नाही. राज्य परिवहन महामंडळाच्या तंत्रज्ञ म्हणून सेवेतून निवृत्ती नंतर कपिल यांनी घरबांधकाम पूर्ण केले. से–वेत असताना मिळणाऱ्या वेतनावर उपजीविका करत बहिणभावाचे शिक्षण, लग्न, आईवडिलांचा सांभाळ, मुलांचे शिक्षण, कौटुंबिक उत्तरदायित्व पार पाडत असताना घर बांधायचे राहूनच गेले, अनब कपिलला सेवानिवृत्तीही जवळ आली ते कळलेच नाही. शेवटी घराचे स्वप्न सेवानिवृत्तीनंतर पूर्ण झाले.

नोकरीच्या पूर्वी कपिल थुटे मंडल चळवळीत सक्रीय असायचा. ओबीसीच्या सामाजिक न्यायाच्या लढ्यातील ते एक संयमी तितकेच सत्यान्वेशी शिलेदार होते. ओबीसी विद्यार्थी संघटना वर्धा जिल्ह्या–तील कानाकोपऱ्यात ओबीसींना भान जागरण देण्याचे काम करत असताना ओबीसी विद्यार्थी संघटनेच्या वाटचालीत कपिलचा लक्षणीय वाटा राहिलेला आहे. मंडलचा लढा विदर्भात जोर पकडत असताना, नव्वदच्या दशकात वर्धा शहरात ओबीसी विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास शिबिरं आयोजित केल्या जात. वर्धा शहरात शिबिरे आयोजनासाठी कपिल हमखास सहयोगी असायचा. शिबिरातून संपर्कात येणाऱ्या तरुणांशी आपुलकीने भावनिक सलोखा जपणं हे तत्कालीन कार्यकर्त्यांचं एक वैशिष्ट्य. कपिलनं हे सातत्याने जोपासलं. ओबीसी चळवळ, सत्यशोधक समाजाचे कार्य करत असतानाच, विद्रोही सांस्कृतिक चळवळीत सक्रियता यामुळे कपिलच्या कार्याबद्दलची अधिक व्याप्ती लक्षात येते. आणि सत्यशोधक पद्धतीने त्यांनी केलेले लग्न, आणि नवीन वास्तूमध्ये केलेला गृहप्रवेश म्हणजे त्यांची वैचारिक बांधिलकी आणि मनाला विलक्षण समाधान, आनंद व प्रसन्नता देणारा उत्सव होय.

“नव्याने बांधलेल्या वा विकत घेतलेल्या घरात पहिल्यांदा प्रवेश करणे, हा व्यक्तीच्या व कुटुंबाच्या जीवनातील अतिशय समाधानाचा, कृतार्थतेचा आणि परिपूर्तीचा सण असतो. या घरासाठी त्या कुटुंबाने अनेक प्रकारचे कष्ट घेत–लेले असतात, ताण सहन केलेले असतात, वेळ आणि पैसा खर्च केलेला असतो, प्रचंड धावपळ केलेली असते आणि एवढे सगळे केल्यानंतर स्वत:च्या हक्काच्या घरात प्रवेश करण्याचा क्षण आ–लेला असतो. स्वतःच्या निव–ासस्थानातील स्वातंत्र्याचा खरा आस्वाद घेण्याची वेळ आलेली असते . स्वाभाविकच , कुटुंबातील सर्वांची मने त्या घरात अधिकृतपणे पहिल्यांदा प्रवेश करण्यासाठी उत्सुक झालेली असतात.”

मोठ्या आनंदाच्या वाता–वरणात कपिलच्या घराचा गृहप्रवेश सोहळा सत्यशोधक पद्धतीने साजरा झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.जनार्दन देवतळे सर होते तर, प्रमुख अतिथी प्रा नूतन माळवी, डॉ अशोक चोपडे, बाबा बिडकर, अनुज हुलके व गजेंद्र सुरकार हे होते. राष्ट्रमाता जिजाऊ, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फ्रुले, सावित्रीबाई फ्रुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून महात्मा फुले रचित “सत्य सर्वांचे आदिघर सर्व धर्माचे माहेर...”आणि “स्त्रिपुरुष सर्व कष्टकरी व्हावे...” हे अखंड बाबा बिडकर आणि अनुज हुलके यांनी गाऊन सुरुव–ात केली. कपिल थुटे यांनी घराचे बांधकामासाठी मदत करणारे, गवंडी, मिस्त्री, ईलेक्ट्रीशन, प्लंबर, वेल्डिंग, रंगरंगोटी कारागीर यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सत्यशोधकी विधीनुसार त्यांचा शाल अर्पण करून सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सत्यशोधक गृहप्रवेश विधीचे औचित्य आणि बळीजनांची सांस्कृतिक परंपरा यासंबंधी मान्यवर अतिथींनी मार्गदर्शन करुन उपस्थित प्रियजनांशी संवाद साधला. प्रा नूतन माळवी यांनी अशा प्रकारचा गृहप्रवेश कार्यक्रम घेण्यामागील हेतू विशद केला. कपिल थुटे मागील सुमारे ३५ वर्षे जिजाऊ, शिवराय, महात्मा फ्रुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालणाऱ्या चळवळीत सक्रीय असून सत्यशोधकी विचाराचा पाईक आहे. त्यांची सत्यशोधकी विचाराची बांधीलकी आपल्याला या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिकेतून समजून घ्यावी लागेल. आजची एकुणच सामाजिक राजकीय परिस्थिती आणि सत्यशोधक समाजाची चळवळ याचे महत्व त्यांनी समजून सांगितले.

अनुज हुलके यांनी सत्यशोधक विधीचा पर्याय का निर्माण झाला ते सांगितले. विवाह, गृहप्रवेश, नामकरण, ग्रहशांती, पिंडदान इ.निमित्ताने पुरोहित लुडबुड करुन स्त्रिशुद्रातिशूद्रांचे अमानवी शोषण करतात. सत्यशोधक समाजाच्या तत्वानुसार शुद्रातिशुद्रांनी धर्मकृत्ये ब्राह्मण पुरोहिताकडून करून घेणे निषिद्ध मानण्यात येते. पाखंडी धर्माच्या नावाखाली भटपुजाऱ्यांनी पोट भरण्यासाठी धार्मिक विधी करायचे आणि त्यामाध्यमातून भोळ्याभाबड्या लोकांना धार्मिक गुलामी, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता यात गुंतवून ठेवायचे. या शोषणव्यवस्थेला वाचा फोडण्यासाठी ब्राम्हणपुरोहिताशिवाय धार्मिक विधी करण्यात येऊ लागले, त्यातून सत्यशोधक विधीवत लग्न, गृहप्रवेश, पिंडदान, नामकरण करण्याचे पर्याय तयार झाले. सगळीकडे धर्माच्या मिषाने शोषणयंत्रणा आजही तगडी असताना ब्राम्हणी वर्चस्व झुगारून देण्यासाठी अशाप्रकारे पाऊलं उचलणं गरजेचे आहे.

बाबा बिडकर म्हणाले की, कपिल थुटे हे अनेक वर्षे सत्यशोधक चळवळीत सक्रीय असून सत्यशोधक पद्धतीने गृहप्रवेश कार्यक्रम आयोजित करुन मित्रमंडळी आणि नातेवाईक यांच्या समोर एक आदर्श उभा केला. वैयक्तिक जीवनातील जबाबदारी सांभाळूनही सामाजिक कार्यकर्ते नेटाने काम करत असतात, हीच सत्यशोधकी परंपरा आहे. सम्राट बळीराजा, गौतम बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम,छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गाडगेबाबा, बाबासाहेब आंबेडकर यांनी भेदभाव विषमतानिर्मूलनासाठी मोठा लढा उभा केला. त्यामुळे आजचे वर्तमान स्वातंत्र्य लोक हितावह ठरत आहे. या तमाम महामानवांचा वारसा चालविणे हाच अशा प्रकारच्या कार्यक्रमामागील हेतू आहे.

डॉ अशोक चोपडे यांनी सांगितले की, सत्यशोधक पद्धतीने अनेक कार्यक्रम होऊ लागल्याने ही प्रथा मोठ्या प्रमाणात कष्टकरी शेतकरी आणि मध्यम जातीतील ओबीसी लोकांमध्ये रुढ होऊन ब्राह्मण पुजाऱ्याशिवाय लोक कार्य करु लागले. अठरापगड जातीतील पुजारी तयार होऊ लागले.आणि धार्मिक विधी करु लागले. शिक्षण क्रांतीसोबतच सांस्कृतिक संघर्ष उभा राहून आत्मसन्मान जागा होऊ लागला. हे फार महत्त्वाचे काम सत्यशोधक चळवळीमुळे होत गेले. पापपुण्य या संकल्पना थोतांड असून शिक्षण घेऊनच माणूस सुखी होणे शक्य आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा सोडून भिती सोडून समाज भयमुक्त व भटमुक्त झाला पाहिजे ही सत्यशोधकी भूमिका समजून घ्यावी लागेल.

गजेंद्र सुरकार यांनी वास्तुशास्त्र आणि अंधश्रद्धा याविषयी संवाद साधला. ते म्हणाले, दक्षिण दिशा अपवित्र मानली जाते पण बाजारपेठेत कित्येक दुकान दक्षिणमुखी असतात, तरी धंदा चांगला तेजीत चालतो. प्रचंड नफेखोरी, लबाडी करुन दुकानदार श्रीमंत होत असतात. त्यामुळे थोतांड वास्तुशास्त्रापेक्षा शुद्ध हवा ऊन पाऊस या आरोग्यदायी नैसर्गिक बाबी ध्यानात घेऊन फ्रार कर्जबाजारीपणा न करता घराचा निवारा म्हणून विचार करावा.

प्रा. जनार्दन देवतळे अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले, अनेक चुकीच्या रुढी परंपरा ह्या अज्ञान व भिती यामुळे समाजाला घातक ठरल्या. बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर ठेवून उच्चजातीय समूह शोषण करत राहिले. सत्यनारायण पूजा, इत्यादी कर्मकांड व व्रतवैकल्ये यातून धार्मिक गुलामी लादून शोषण व्यवस्था पक्की केली. याविरुद्ध महामानव निकराची लढाई लढत आलेत. तो वारसा आपण सर्वांनी समजून घेतला पाहिजे. त्यासाठी च कपिल थुटे यांच्या ग्रुहप्रवेशाच्या या कार्यक्रमाचे प्रयोजन आहे.

आपणही अशाप्रकारे कित्ता गिरवून धार्मिक, सांस्कृतिक स्वातंत्र्याचा उद्घोष करावा. याप्रसंगी सत्यशोधक समाजाचे मा.गुणवंत डकरे वर्धा जिल्हा अध्यक्ष मा.टेमराज माले ना–गपूर जिल्हा अध्यक्ष तसेच नरेंद्र सहस्त्रबुद्धे संघटक सत्यशोधक समाज नागपूर आणि मित्रपरिवार व नातेवाईक नामदेवराव येरेकर, राजेंद्र पांडे, पंकज येरेकार सरोज घुबडे, विजय थुटे, गोविंदराव थुटे, प्रा.चंद्रभान जी वाडेकर सर,नितीन वाडेकर प्रामुख्याने उपस्थित होते. कपिलच्या जडणघडणीत अतिशय कष्ट करून तसेच कौटुंबिक सांभाळ करणाऱ्या आई राधाबाई थुटे यांचा शाल देऊन कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. कपिल, कल्पना थुटे, सुमेध, प्रज्ञा, यश शारदा खूप उत्साहाने कार्यक्रमात कार्यमग्न होते.

**अनुज हुलके**

# गोंदियाचे दोन युवक उभारताहेत गोंदियात आयटी कंपनी

## गोंदियातील दोन युवकांची भरारी: अनेकांचा मिळणार रोजगाराची संधी

**गोंदिया:** आयटी कंपनीमध्ये नोकरी करण्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर येथे गेल्याशिवाय स्थानिक युवकांना पर्याय नाही. मात्र ते बऱ्याच जणांना काही अडचणीमुळे शक्य होत नाही. परिणामी, त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा त्यांना उपयोग होत नसल्याने त्यांना निराशा येते. पण ही वेळ गोंदिया जिल्ह्यातील युवकांवर येऊ नये, स्थानिकांना आयटी कंपनीत काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी गोंदिया येथील दोन युवकांनी गोंदिया येथे आयटी कंपनी उभारण्यास सुरुवात केली आहे. सध्या ते अमेरिकेत स्थायीक असून, त्यांनी आपल्या कंपनीचे मुख्यालय गोंदिया येथे सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

आशिष चव्हाण आणि सुधीर बिसने अशी गोंदिया येथे आयटी कंपनी सुरु करणाऱ्यांची नावे आहेत. या दोघांनी १० ते १५ वर्षापुर्वी करिअरसाठी गोंदिया सोडले. यानंतर ते अमेरिकेतील आयटी कंपनीत रुजू झाले. तिथे अनेक वर्षे काम केल्यानंतर दोघांनी स्वत:ची आयटी कंपनी सुरु केली. अमेरिकेसह भारतातही त्यांनी आपल्या इन्फो ओरिजिन इंक या कंपनीचे काम सुरु केले आहे. यासाठी त्यांनी दिल्ली येथील आयआयटीसह करारही केला आहे. हे दोघेही मुळचे गोंदिया येथील असल्याने त्यांनी आपल्या आयटी कंपनीचे मुख्यालय गोंदिया येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी त्यांनी गोंदिया शहरालगतच साडेचार एकर जागा खरेदी केली आहे. त्या ठिकाणी कंपनीच्या मुख्यलायाचे कामही सुरु झाले आहे. तर तात्पुरत्या स्वरूपात एक इमारत भाड्याने घेून तिथे ही कंपनीचे काम सुरु केले असून त्या ठिकाणी गोंदिया जिल्ह्यातील आयटी क्षेत्राशी निगडित ८० युवक-युवतींना काम मिळाले आहे. जिल्ह्यातील युवकांना आयटी क्षेत्रातील रोजगाराची संधी जिल्ह्यातच इन्फो ओरिजिन इंक कंपनीच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचे आमचे ध्येय आहे. पहिल्या टप्प्यात ५०० युवकांना आणि दुसऱ्या टप्प्यात १,००० हजार युवकांना रोजगार देण्याचा आमचा मानस असल्याचे सुधीर बिसने आणि आशिष चव्हाण यांनी सांगितले.

### दोघांचाही प्रवास धक्क करणारा

**आशिष चव्हाण आणि सुधीर बिसने यांच्या यशाच्या प्रवासाची कहाणी त्यांच्या यशाइतकीच आश्चर्यकारक आहे. दोघांनीही आपले प्राथमिक शिक्षण गोंदियातून पूर्ण केलेश्र. आशिष गुजराती नॅशनल हायस्कूलचा तर सुधीर बिसने रविंद्रनाथ टागोर हायस्कूलमध्ये शिकला. रामटेक येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश करण्यापुर्वी डीबी सायन्स कॉलेजमधून विज्ञान विषयात पदवी पूर्ण केली. त्यानंतर ते पुण्याला गेले आणि नंतर अमेरिकेला गेले. २००२ मध्ये वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये नोकरी केल्यानंतर २०१० मध्ये दोघे एकत्र आले आणि त्यांनी स्वत:ची कंपनी सुरु करण्याचा निर्णय घेतला. इन्फो ओरिजिन इंकची सुरुवात २०११ मध्ये सुरुवात केली. यात ते यशस्वी झाले असून आता त्यांच्या कंपनीचे मुख्यालय गोंदियात सुरु करीत आहे.**

### सर्व सुविधायुक्त असणार कार्यालय

**इन्फो ओरिजिन इंक या कंपनीची १० मजली इमारत उभारणीचे काम सध्या सुरु असून यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुविधा असणार आहेत. कॅम्पसमध्ये टेनिस आणि बास्केटबॉल कोर्ट, जिम, फुट कोर्ट, कॅटेल असेल.**



### अनेकांना मिळाला रोजगार

**गोंदियातील अनेकांना या कंपनीत नोकरी मिळाली आहे. यात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. आमच्या टेक लीकडपैकी ५० टक्क्याहून अधिक महिला असून त्यांनी त्यांची क्षमता सिद्ध केली आहे. यापैकी काही कुटुंबातील एकमेव कमावते सदस्य आहेत. स्थानिक युवकांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हाच आमचार मानस असल्याचे सुधीर बिसने आणि आशिष चव्हाण यांनी सांगितले.**

# धानखरेदीसाठी आदिवासी क्षेत्रात मार्केटिंग फेडरेशनची घुसखोरी

## आयुक्ताच्या पत्राला केराची टोपली

**गोंदिया** : गोंदिया जिल्ह्यात मुख्यत: आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फ्रेडरेशन या दोन अभिकर्ता संस्थांच्या माध्यमातून आधारभूत किंमतीमध्ये धानखरेदी केली जाते. दोन्ही संस्थांना गैर आदिवासी व आदिवासी असे क्षेत्र धानखरेदीसाठी निर्धारीत करण्यात आले आहे. मात्र जिल्हा मार्केटिंग फ्रेडरेशनकडून धानखरेदीसाठी देण्यात आलेल्या परवानगी धारक संस्था आदिवासी क्षेत्रात घुसखोरी करून धानखरेदी करीत आहेत. याचा फटका आदिवासी विकास महामंडळाला बसत आहे. या संदर्भात आदिवासी विकास महामंडळ व आरटीआय कार्यकर्ता रोशन बडोले यांनी आयुक्ताकडे तक्रार केली. त्यानुरूप जिल्हा मार्केटिंग संस्थेला पत्र देवून हा प्रकार थांबविण्याच्या सुचना केल्या आहेत. असे असतानाही मार्केटिंग फेडरेशनच्या संस्था आदिवासी क्षेत्रात धानखरेदी करीत आहेत. त्यामुळे हा मुरजोरपणा कुणाच्या अभयदानातून सुरू आहे, असा सवाल उपस्थित होवू लागला आहे.



### आरटीआय कार्यकर्त्याच्या पत्राची दखल

**सडक अर्जुनी येथील आरटीआय कार्यकर्ता रोशन बडोले यांनी गैर आदिवासी व आदिवासी या क्षेत्रात कुणाला धानखरेदी करण्याची परवानगी आहे, या बाबत माहिती आयुक्ताकडे मागितली होती. त्याचबरोबर हा गैर प्रकार निदर्शनास आणून दिला होता. या पत्राची आयुक्ताने दखल घेतली असून जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला गैरप्रकार थांबविण्याच्या सुचना केल्याची माहिती आहे.**

गोंदिया जिल्ह्यात मुख्यत: धानपीक शेती होते. शेतकऱ्याचे शेतमाल विक्रीमध्ये फसवणूक होऊ नये, याकरीता शासनस्तरावर पणन विभागाच्या माध्यमातून मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या दोन प्रमुख अभिकर्तांना धानखरेदीची परवानगी देण्यात आली आहे. या दोन्ही अभिकर्ताकडून संस्थांना धानखरेदीची परवानगी देण्यात येत असते. दोन्ही संस्थांना गैर आदिवासी व आदिवासी अशी विभागणी करून धानखरेदी करण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. मात्र जिल्हा मार्केटिंग फडरेशनच्या परवाना धारक संस्था आपल्या मनमर्जीने आदिवासी क्षेत्रात धानखरेदी करीत आहेत. हा प्रकार मागील खरीप व रब्बी हंगामात उघडपणे पहावयास मिळाला. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाकडून या बाबतची तक्रार आयुक्तासह शासनाकडे करण्यात आली होती.

आयुक्ताने जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला या बाबतची सहनिशा करून आदिवासी क्षेत्रात धानखरेदी कशी केली जात आहे, असा जबाब देखील मागविला होता. मात्र असे असतानाही रब्बी हंगामात सुध्दा मोठ्या प्रमाणात जिल्हा मार्केटिंगच्या अख्यात्यारित असलेल्या संस्थांनी आदिवासी क्षेत्रातून धानखरेदी केली आहे. याचा फटका आदिवासी विकास महामंडळाला बसत आहे.

## दोन तालुक्यांतील रस्त्यांची समस्या मार्गी लागणार

### ५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर: मनोहर चंद्रिकापुरे यांची माहिती

**अर्जुनी-मोरगाव:** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा दोन अंतर्गत अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील ४१.७१ कि.मी. रस्त्याच्या कामासाठी तब्बल ५७ कोटी २७ लक्ष रुपयांचा निधी प्रशासकीय मान्यतेसह मंजूर करण्यात आला आहे. मान्यतेसह शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहे. त्यामुळे मतदारसंघातील विविध गावांतील दळणवळण सुविधा गतिमान होऊन वाहतुकीच्या दृष्टीने ग्रामीण जनतेला याचा लाभ होणार आहे.

आ.मनोहर चंद्रिकापुरे यांनी या रस्त्यांच्या बांधकामासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानुरुप ५७ कोटी २७ लक्ष रुपयांचा निधी रस्त्यांच्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आला.



अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील बोडगाव ते कढोली रामनगर रस्त्यासाठी ६ कोटी ६८ लक्ष रुपये, गुढरी ते सिरेगावबांध ५ कोटी १४ लक्ष रुपये, राज्य महामार्ग क्र.११ ते जानवा कडगाव रस्त्यासाठी ६ कोटी ५२ लक्ष रुपये, नवेगावबांध-चान्ना कोडका रस्त्यासाठी ६ कोटी ६३ लक्ष रुपये, राज्य महामार्ग गंधारी ते जांभळी रस्त्यासाठी ६ कोटी ९१ लक्ष रुपये, राज्य महामार्ग क्र.११ खोबा ते गोसाई कोकणा रस्त्यासाठी ५ कोटी ५९ लक्ष रुपये, सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी ते मुरपार रस्त्यासाठी ६ कोटी ४८ लक्ष रुपये, जिल्हा महामार्ग उसीखेडा ते दल्ली बामणी रस्त्यासाठी ६ कोटी ७ लक्ष रुपये रस्ता क्रमांक २६ परसोडीटोला ते निंबा पिपरटोला रस्त्यासाठी ९६२.२६ रुपये लक्ष निधी मंजूर करण्यात आले आहेत. मंजून निधीतून लवकरच कामाला गती मिळणार आहे.

# दुर्गम भागात कीटकजन्य कार्यक्रमाची केली पाहणी



**गोंदिया:** जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी सालेकसा तालुक्यातील दरेकसा, गोर्रे, बिजेपार या दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन कार्यक्षेत्रात किटकजन्य कार्यक्रमाची होत असलेल्या कामाची पाहणी केली.

प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथील हिवताप दुषित रुग्णांचा आढावा घेऊन आंतररुग्ण विभागात असलेल्या रुग्णाची विचारपूस करुन दिल्या जात असलेल्या औषधोपचाची माहिती जाणून घेतली. प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथील अतिदुर्गम मुरकुडोह या गावाला भेट देऊन किटकजन्य कार्यक्रमाची पाहणी केली. गावात आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत ताप रुग्ण व कंटेनर शोधमोहिमेची माहिती जाणून घेतली. किटकजन्य आवाराबाबत सालेकसा तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस गिरी, डॉ.बारई, डॉ. वानवे यांच्या संस्थेतील आरोग्य कर्मचाऱ्यांकडून राबविण्यात येत असलेल्या कार्याचे समाधान व्यक्त करुन दररोज होत असलेल्या कामाचे पर्यवेक्षण चांगल्याप्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. भेटी दरम्यान त्यांच्यासोबत डॉ. वेदप्रकाश चौरागडे, डॉ. अमित खोडणकर, आरोग्य पर्यवेक्षक ठाकरे, आरोग्य सहाय्यक किशोर भालेराव उपस्थित होते. डॉ. विनोद चव्हाण यांनी भेटी दरम्यान आरोग्यवर्धिनी केंद्र दरेकसा येथील प्रयोगशाळेत भेट देऊन ताप रुग्णाचे तपासणी होत असलेल्या रक्त नमुन्यांची सुक्ष्मदर्शकाद्वारे तपासणीचे पाहणी केली. त्यावेळी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी ललीत रहांगडाले व श्रुती उप्पलवार हजर होते.

कार्यक्षेत्रातील १०० टक्के अंडवृद्धी शस्त्रक्रीया होण्याच्या दृष्टीने ग्रामीण रुग्णालय येथे भरती करणे, आश्रमशाळा व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची आरडीकेकिटद्वारे रक्त तपासणी करणे, स्थलांतरीत लोकांचे यादी अद्यावत करुन पत्ता सिजन कामावरुन गावी परतलेल्या लोकांचे हिवतापाबाबत तपासणी करणे, हत्तीपाय रोग ग्रेड-३ वरील रुग्णांना अपगंत्व प्रमाणपत्र मिळण्याबाबतचे नियोजन करणे, आरोग्य संस्थेत हिवताप बाबतचे रक्त नमुने बॅंकलॉग ठेवू नये, हिवतापाबाबत गप्पी मासे व लारवा यांचे शाळेत प्रात्याक्षिक जनजागृती कार्यक्रम घेणे आदि विविध बाबी सोबतच लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून सुधारणा करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

### रजिष्टर व रेकॉर्डची केली पडताळणी

**किटकजन्य कार्यक्रमाचे आवश्यक रजिष्टर व रेकॉर्डची पडताळणी केली. तसेच आंतररुग्ण वॉर्ड, औषधीसाठा केंद्र आदींची पाहणी केली. कार्यक्षेत्रातील गावे हे अतिदुर्गम व जंगलव्याप्त असल्याने हिवतापाबाबतची साथ उद्‌भवू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे, कीटकजन्य, जलजन्य आजार तसेच साथीच्या रोगाबाबत उपाययोजना करणे, १ ते ३१ जुलैदरम्यान डेंग्यू प्रतिरोध महिना साजरा करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, गुणवत्तापूर्वक किटकनाशक फवारणी करण्याच्या दिल्या सुचना.**

# गोंदिया विधानसभेत काँग्रेस राजकुमार पटले यांना उमेदवारी जाहीर करणार?

## * बहुजन नेतृत्व देऊन काँग्रेस बाजू भक्कम करण्याच्या प्रयत्नात

**गोंदिया** - लोकसभा निवडणुकीत भक्कम कामगिरी करणाऱ्या काँग्रेसने आता आपले लक्ष विधानसभेकडे वळविले असून सर्वच मतदार संघात संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. गोंदिया विधानसभा क्षेत्रातही अनेक इच्छुक असले तरी पक्षाची बाजू भक्कमपणे सांभाळणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजकुमार (पप्पू) पटले यांच्यावर विश्वास दाखवत काँग्रेस त्यांना उमेदवारी जाहीर करणार का? असा प्रश्न सामान्य कार्यकर्त्यांना पडला आहे.



सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत गोंदिया विधानसभा काँग्रेसचे माजी आमदार यांनी काँग्रेस ला रामराम केल्यानंतर या निवडणुकीत पक्षाची दाणादाण उडाली होती. काँग्रेसच्या उमेदवाराला फक्त ८ हजाराच्या जवळपास मते मिळाली होती. हे काँग्रेसचे पानिपत होते. त्यानंतर प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड, पक्षाचे नेते गप्पू गुप्ता व इतर सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनात पक्षाची धुरा राजकुमार पटले यांनी आपल्या खांद्यावर घेतली. मागील पाच वर्षात गोंदिया विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गाव पिंजून काढत त्यांनी पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविली. त्याचेच प्रत्यय त्यांना लोकसभेच्या निवडणुकीत पाहायला मिळाले. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या चिन्हावर गोंदिया विधानसभा निवडणूक लढवावी, असा आग्रह सामान्य कार्यकर्त्यांकडून केला जात. विशेष म्हणजे राजकुमार (पप्पू) पटले हे गोंदिया विधानसभा क्षेत्रात सर्वाधिक मतदार असलेल्या पोवार समाजातून येत असल्याने समाजाची ताकद ही त्यांच्या पाठीशी असणार यात काही शंका नाही. त्याचप्रमाणे ओबीसी चळवळीतही त्यांचा सक्रिय सहभाग असल्याने बहुजन चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

राजकुमार (पप्पू) पटले यांनी २००० ते २००३ पर्यंत छडणख च्या जिल्हा कार्यकारिणीत सक्रिय सदस्य म्हणून काम केले आहे. त्यानंतर २००३ ते २००५ पर्यंत युवक काँग्रेसच्या कार्यकारिणीत सक्रिय कार्य करून आपल्या कामाची चुणूक दाखवून दिले आहे. त्यानंतर २०१५ मध्ये फुलचुर सहकारी संस्था येथे संचालक पदावर कार्य करून संस्थेच्या वतीने त्यांची बॅंक प्रतिनिधी म्हणून निवड केली होती. २०१९ मध्ये महत्वाचे असलेल्या खादी ग्राम उद्योग मध्ये सहसचिव पदावर कार्य केले. २०२० मध्ये पुन्हा सेवा सहकारी संस्था फ्फुलचुरचे संचालक बनले. २०२२ मध्ये पुन्हा खादी ग्रामोद्योग मध्ये सचिव पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली. २०२३ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जिंकून ते उपसभापती बनले.

मागील पाच वर्षांत गोंदिया विधानसभा क्षेत्रात पक्ष संघटन व पक्ष बळकटकरण संदर्भात केलेल्या कार्यामुळे २०२४ च्या भंडारा - गोंदिया लोकसभा निवडणुकीत त्यांची गोंदिया विधानसभा निरीक्षक पदावर नियुक्ती करण्यात आली होती. लोकसभानंतर लगेच त्यांना गोंदिया विधानसभा समन्वयक पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठी गोंदिया विधानसभा निवडणुकीत त्यांच्यावर विश्वास टाकणार, असा विश्वास सामान्य कार्यकर्त्यांना झालेला असल्याचे जाणवते.

## खाणीतील खड्ड्यात आंघोळ करणे जिवावर बेतले; मुलाचा बुडाल्याने मृत्यू

गोंदिया : गावाबाहेर असलेल्या मुरमाच्या खाणीतील खड्ड्यात बुडाल्याने दहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही घटना पिंपळगाव/खांबी येथे घडली. रजनिश वामन शिवनकर (१०), असे मृताचे नाव आहे. तो मनोजदेव मानकर आदिवासी आश्रम शाळा बोंडगांव देवी येथे इयत्ता चवथीत शिकत होता.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात गेल्या तिन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे सर्वत्र पुरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यातील पिंपळगाव/खांबी येथील वामन शिवनकर यांची दोन्ही मुले अन्य मुलांसोबत पटाची दान फिरायला परिसरात गेले. या परिसरात मोठमोठ्या मुरमाच्या खाणी असून पावसाने मुसळधार तुडुंब भरल्या आहेत. या खाणीत ही मुले आंघोळ करण्यासाठी उतरली. यामधे रजनिश शिवनकर हा दहा वर्षाचा मुलगा खोल पाण्यात गेला. खोल पाण्यात बुडत असताना त्याच्या मोठ्या भावाने रजनिशला वाचविण्याचा प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही. त्यामुळे इतर घाबरलेली मुले लगेच गावात येऊन लोकांना घडलेल्या घटनेची माहिती दिली. कुटुंबीय व गावकरी घटनास्थळी आले. गावकऱ्यांच्या मदतीने मुलाला बाहेर काढण्यात आले. मात्र तोपर्यंत मुलाचा मृत्यू झाला होता.माहीती मिळताच अर्जुनी मोर. पोलीस घटनास्थळी पोहोचले. मुलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव येथे पाठविण्यात आले आहे. या घटनेने परिसरात व पिंपळगाव/खंबी गावात हळहळ व्यक्त होत आहे. अर्जुनी मोरगाव ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोनटक्के यांच्या मार्गदर्शनात या घटनेचा पुढील तपास बिट अंमलदार कोडापे करीत आहेत.



# मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब,एकदा चौकशी होऊन जाऊद्याच!

## थकबाकीत महाघोटाळा झाल्याचा आरोप, काही कर्मचारी तुपाशी... तर काही उपाशी?

**गोंदिया:** शालार्थ प्रणालीतून थकबाकीची रक्कम फुगवून काढण्याचे प्रकार घडले. यातून शासनाच्या तिजोरीला मोठा फटका बसला. जिल्हा परिषदेचे मागणी केल्याप्रमाणे शासनाकडून निधी प्राप्त होऊनही अद्याप अनेक कर्मचाऱ्यांना थकबाकीची राशी मिळू शकली नाही. मागणी केलेला निधी संपतो व परत परत परत मागणी करावी लागते यातच घोटाळा दडला आहे. असा आरोप आहे. विशेष म्हणजे सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी चौकशी करण्याची गरज लावून धरण्याऐवजी मौन धारण केल्याने शंकेला वाव मिळत आहे. त्यामुळे सीईओ साहेब एकदा चौकशी होऊन जि.प.तील थकबाकी महाघोटाळा उघडकीस येऊ द्या अशी चर्चा जिल्हा परिषद वर्तूळात आहे.

त्यातच मुख्य लेखा वित्त अधिकारी कार्यालयाने शिक्षणाधिकारी यांना चौकशी करुन कारवाईचे निर्देश दिले होते.परंतु यातही कुठे माशी शिंकली कुणास ठाऊक लेखा विभागही आजच्या घडीला गप्प का गप्प बसला असा प्रश्न उपस्थित झालेला आहे.



गेल्या दोन महिन्यांपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती कर्मचारी एकस्तर वेतनश्रेणी, अतिरिक्त घरभाडे भत्ता व १५ टक्के प्रोत्साहन भत्ता थकबाकीत मशुगुल आहेत. यात प्रचंड घोळ करण्यात आले आहेत. फरकाची राशी कमी असतानाही ती वाढवून थकबाकीची रक्कम काढणे, एकाच थकबाकीची दोनचा उचल करणे, थकबाकी काढणे व नंतर तीच रक्कम चालानद्वारे शासकीत तिजोरीत जमा करणे असे अनेक प्रकार जिल्ह्यात घडले.

फेब्रुवारी २०२४ मध्ये तालुक्यातील एका शाळेचे पुरवणी बिल सादर करण्यात आले. ऑगस्ट २००२ ते जून २०२२ पर्यंतची थकबाकी काढण्यात आली. मुळात १९४९५० रुपये थकबाकी असताना प्रत्यक्षात २३६९४९ रुपये फरकांचे विवरणपत्र सादर करुन बिल काढण्यात आले. तब्बल ४०९९९ रुपये अतिरिक्त काढण्यात आले आहेत. जुलै ते नोव्हेंबर २०२३ ते महामाई भत्ता थकबाकीची रक्कम १४१०० रुपये देय असतानाही डिसेंबर २०२३ च्या वेतनात २७ हजार रुपये काढले आहेत.

ऑगस्ट २०१० ते जून २०२४ पर्यंत एकस्तर वेतनश्रेणीची थकबाकी फेब्रुवारी २०२४ च्या पुरवणी बिल दोनमध्ये काढण्यात आली. ७५५२६ रुपये देय रक्कम असताना प्रत्यक्षात ४०६७६६ रुपये काढण्यात आले. अशाप्रकारे एकंदरीत ३८४१३९ रुपयांची अनियमितता उजेडात आली आहे. मात्र दोषीवर कारवाई थंडबस्त्यात आहे.

### असेही कारनामे

**प्राथमिक शाळेतील प्रत्येक मुख्याध्यापकाला आहरण व वितरण अधिकारी १ चे अधिकार देण्यात आले. त्यामुळे शाळेतील शिक्षकांचे पगार व थकबाकी काढण्याची जवाबदारी मुख्याध्यापकांची असते. काही शाळांत एकाच थकबाकीचे दोनदा देयक सादर करुन रकमेची उचल करण्यात आली. काहींनी दुसऱ्या तालुक्यात कार्यरत असताना आधी तिथे व नंतर बदली झालेल्या तालुक्यात थकबाकीच्या रकमेची दुसऱ्यांदा उचल केली आहे. असे काही शिक्षक निवृत्त सुद्धा झाले आहेत. जिल्ह्यात सर्वत्र याचे लोण पसरले असून चौकशी करण्याचे मोठे आव्हान जिल्हा परिषदेसमोर आहे.**

### दखल घेऊन फौजदारी गुन्हे दाखल करा

**कमिशनखोरी करणारे दलाल यात सहभागी असणारे आणि वाढीव थकबाकीची उचल करणारे कर्मचारी यांची सखोल चौकशी करुन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. जेणेकरुन शासनाच्या तिजोरीची लुट होणार नाही, असा सूर व्यक्त केला जात आहे. शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या रॅकेटवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी केली जात आहे.**

### आधी अतिरिक्त रक्कम काढा अन् नंतर भरा

**एका शिक्षीकेच्या नावे फेब्रुवारी महिन्यात २२०५३१ रुपये एकस्तर वेतनश्रेणी व अतिरिक्त घरभाडे थकबाकी काढण्यात आली. कुठे माशी शिंकली कुणास ठाऊक. २० जूनला शिक्षण क्रीडा व संस्कृती या लेखाशिर्षकात अतिरिक्त घरभाडेची अतिप्रदान केलेली रक्कम स्थानिक कोषागारात चालानद्वारे भरणा करण्यात आली. यामागील सत्य अद्यापही गुलदस्त्यात आहे. अधिकच्या थकबाकीची रक्कम काढूण घ्यायची.ती शाळेच्या बॅंक खात्यावर चार महिन्यांपर्यंत ठेवायची, नंतर ही बाब उजेडात आली म्हणून त्याच रकमेचा भरना करायचा असा प्रकार सुरु आहे.**

# राष्ट्रवादी काँग्रेस बुथ कमिटीच्या बैठकीला माजी.आ.जैन यांचे मार्गदर्शन

**गोंदिया:** तालुक्यातील किन्ही, देवरी, नवेगाव, निलागोंदी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बूथ कमेटी सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ताची बैठक माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांशी विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच त्या समस्या खासदार प्रफ्फुल पटेल यांच्या माध्यमातून सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी दिले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून बूथ कमेटीचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रत्येक बूथवर क्रियाशील लोकांची कमेटी बनविणे कमिटीमध्ये महिला, युवक व सर्व घटकांच्या नवीन लोकांना जोडण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे. राज्य शासनाने महिलांच्या उन्नती व स्वावलंबनासाठी तसेच युवकांसाठी अंमलात आणलेल्या विविध योजनांची माहिती माजी आमदार जैन यांप्रसंगी दिली.



याप्रसंगी यावेळी सर्वश्री राजेंद्र जैन, कुंदनभाऊ कटारे, केतन तुरकर, निरज उपवंशी, रवी पटले, नरेश गजभिये, नंदलाल लिल्हारे, संजय नेवारे, कपूरचंद ठाकरे, देवलाल कटरे, गेंदलाल मस्करे, अभिमन्यू जतपेले,रवी मुलतानी, प्रज्वल चौरे, लक्ष्मण खरोले, प्रवीण खरोले, अमित जतपेले, राकेशसिंह जतपेले, गुनीराम माने, हेमराज पटले, योगराज खरे, चंद्रशेखर डहाट, धर्मेंद्र राऊत, दिनेश ऊके, फ्फुलचंद कावडे, केशवपुरी मुलतानी, जितेंद्र धुर्वे, रामप्रसाद खरे, सुरेश कहनावत, महादेव कावडे, रमेश बिसेन लखाराम पाचे, योगेश आंबाडारे, गणराज कहानावत, चंदनलाल कहणावत, उमेश बघेले, देवीलाल कहणावत, अमोल कहनावत, वामनपुरी मुलतानी, धनलाल लिल्हारे, लक्ष्मीप्रसाद लांजेवार, राजेंद्र चन्ने, रवी कवरे, अनिल नागदेवे, पवन नागपूरे, योगेंद्र श्रीभद्रे, गेंदलाल नागपुरे, मनोज बोहणे, बळीराम लिल्हारे, आशिष राणे, आरजू मेश्राम, दिलीप राणे, राजेश ऊके, ताराबाई टेकाम, रामराज खरे, रामभरोस बिसेन, छगन कोकोडे, दिनेश कोकोडे, जीवन परतेती, राधेश्याम बिसेन, धर्मेंद्र कोकोडे, भागेस बिजेवार, कृष्णकुमार जयस्वाल, मोहन पटले, रमेश सोनवाणे, तुकाराम ऊके, मुन्ना राऊत, अनंतलाल ठाकरे, भागेश के बीजेवार, सदानंद बिरणवार, रूपराज बिजेवार, बहादुर भलावी, रमेश लिल्हारे, भूमेश्वर बिजेवार, तिलकचंद दमाहे, परमानंद नेवारे, गेंदलाल ठाकरे, वामेंद्र बिजेवार सहीत मोठया संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# ठार झालेल्या नक्षलवाद्यांत ७ पुरुष ५ महिला, दोन राज्यांत २ कोटींहून अधिक बक्षीस

**गडचिरोली :** १७ जुलै रोजी गडचिरोली–छत्तीसगड सीमेवरील जारावंडी पोलीस हद्दीतील वांडोली गावानजिक उडालेल्या पोलीस–नक्षल चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटली असून यात ७ पुरुष व ५ महिलांचा समावेश आहे. सर्वांवर छत्तीसगड आणि महाराष्ट्र शासनाचे २ कोटींहून अधिक बक्षीस होते. मृत्तांमध्ये कसनसूर–चातगाव आणि टिपागड–कोरची दलमच्या ५ वरिष्ठ नेत्यांचादेखील समावेश आहे. चकमकीत ठार झालेल्या नक्षल्यांमध्ये १६ लाख बक्षीस असलेला चातगाव–कसनसूर संयुक्त दलमप्रमुख तसेच विभागीय समिती सदस्य योगेश दावसिंग तुलावी ऊर्फ्फ नरेंद्र ऊर्फ्फ निरींगसाय याचा समावेश असून त्याच्यावर हत्या, चकमक, जाळपोळ प्रकरणात एकूण ६७ गुन्हे दाखल होते. पोलीस दरबारी कुख्यात नक्षलवादी अशी नोंद असलेल्या योगेशचा अनेक चकमकीत सहभाग होता. त्याच्या मृत्यूने उत्तर गडचिरोलीतील नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले आहे.

पोलिसांनी दिलेल्या म ाहितीनुसार १७ जुलै रोजी जरावंडी पोलीस हद्दीतील वांडोली जंगल परिसरात १२ ते १५ नक्षलवादी नक्षल सप्ताहनिमित्त मोठा घातपात घडविण्याच्या उद्देशाने एकत्र आले होते. यासंदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी त्या परिसरात नक्षलविरोधी अभियान राबविण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सी ६० या विशेष नक्षलविरोधी पथकाचे २०० जवान मुसळधार पावसात वांडोली जंगल परिसरात मोहीमेवर असताना दबा धरून असलेल्या नक्षल्यांनी जवानांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात जावानांनी केलेल्या कारवाईत १२ नक्षलवादी ठार झाले. तर काही नक्षलवादी अंधाराचा फायदा घेत पळून गेले. चकमकीत पोलीस उपनिरीक्षक सतीश पाटीलसह शंकर पोटावी आणि विवेक शिंगोळे हे तिघे जखमी झाले. रात्री उशिरा सर्व मृत नक्षलवाद्यांची ओळख पटविण्यात आली.



यात चातगाव–कसनसूर संयुक्त दलम प्रमुख तसेच विभागीय समिती सदस्य योगेश दावसिंग तुलावी ऊर्फ नरेंद्र ऊर्फ निरींगसाय (३६, रा. भिमनखोजी ता. कोरची), कोरची–टिपागड संयुक्त दलमप्रमुख तसेच विभागीय समिती सदस्य विशाल कुल्ले आत्राम ऊर्फ लक्ष्मण ऊर्फ सरदु (४३, रा. गोरगुट्टा ता. एटापल्ली), टिपागड दलम विभागीय समिती सदस्य प्रमोद लालसाय कचलामी ऊर्फ दलपट (३१ रा. वडगाव ता. कोरची), या तीन मोठ्या नक्षल नेत्यांसह महारु धोबी गावडे (३१, रा.नैनेर ता.अहेरी), अनिल देवसाय दर्रो ऊर्फ्फ देवा ऊर्फ देवारी (२८, रा. मुरकुटी ता. कोरची), सरिता जारा परसा ऊर्फ मिना ऊर्फ रामे (३७,रा. गळदापल्ली, ता. एटापल्ली), रज्जो मंगलसिंग गावडे ऊर्फ समिता ऊर्फ सिरोंती ( ३५,रा. बोटेझरी ता. कोरची), सिता हवके (२७, रा. मोरडपार ता.भामरागड ), रोजा (रा. बस्तर एरीया छत्तीसगड), सागर (रा. बस्तर एरीया छत्तीसगड), चंदा ( रा.माड छत्तीसगड), विज्जू (रा. बस्तर एरीया छत्तीसगड) यांचा समावेश आहे. या सर्वांवर ३०० हून अधिक गंभीर गुन्हे असून महाराष्ट्र शासनाचे ८६ लाख तर छत्तीसगड सरकारचे १ कोटींहून अधिक बक्षीस होते. २०२१ रोजी झालेल्या मार्दीनटोला चकमकीनंतर गडचिरोली पोलिसांना मिळालेले हे सर्वात मोठे यश आहे. या चकमकीनंतर कोरची–टिपागड आणि चातगाव–कसनसूर दलम पूर्णपणे संपला असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

२०२१ पासून गेल्या तीन वर्षांत गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी कारवाईत ८० नक्षलवादी ठार झाले. तर १०२ जणांना अटक करण्यात आली. यादरम्यान २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. पत्रपरिषदेला विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) अंकित गोयल, पोलीस अधीक्षक नील– ोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) एम. रमेश उपस्थित होते.

# अखेर परदेशी शिष्यवृत्तीच्या जाचक अटी सरकारने मागे घेतल्या

**गोंदिया :** अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीमध्ये ङ्गसमान धोरणाफ्च्या नावाखाली जाचक अटी घातल्या होत्या. दहावी, बारावी आणि पदवीला ७५ टक्के गुणांची अट घाल–तानाच शिक्षण शुल्काला ३० ते ४० लाखांची मर्यादा घालून दिली होती. यामुळे परदेशी शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्यांचे पंख छाटले गेल्याचा आरोप होत होता. राज्य शासनाने आता या सर्व अटी मागे घेतल्या असून पदवीमध्ये ५५ टक्के गुण घेणाऱ्या विद्यार्थ्याला परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार आहे. तसेच विदेशी विद्यापीठांमध्ये असणारे सर्व शुल्क आता राज्य सरकार भरणार आहे. त्यामुळे शुल्काला लावला तर आलेली मर्यादा मागे घेण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य शासनाने वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेता यावे म्हणून केंद्रीय सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर सुरुवातीला अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. त्यानंतर हीच योजना अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि मराठा विद्यार्थ्यांसाठीही लागू केली. यातून विद्यार्थ्यांना जागतिक २०० क्रमवारीतील विद्यापीठांच्या पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी टीआरटीआय, नवबौद्ध व अनुसूचित जातींसाठी बार्टी, ओबीसींसाठी महाज्योती, मराठा, मराठा–कुणबी व कुणबी–मराठा समाजाकरिता सारथी या संस्थांमार्फत प्रामुख्याने पीएच.डी. अधिछात्रवृत्ती, परदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती, एमपीएससी, यूपीएस–सी, बँकिंग, रेल्वे व इतर स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण योजना राबवण्यात येतात. परंतु प्रत्येक संस्थेची विद्यार्थी संख्या, इतर निकष वेगवेगळे असल्याने त्यात सुसूत्रता आणण्यासाठी एक समान धोरण निश्चित करण्याचा निर्णय १२ ऑक्टोबर



२०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार परदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अनुसूचित जाती, नवबौद्ध–७५, मराठा, मराठा–कुणबी, कुणबी–मराठा–७५, ओबीसी–७५, आदिवासी–४०, अल्पसंख्याक–२७, खुला प्रवर्ग–२० अशी विद्यार्थीसंख्या निश्चित करण्यात आली. सर्वच प्रवर्गातील पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असले तरच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. सुरुवातीला जागतिक नामांकनात १०० च्या आत असलेल्या विद्यापीठांत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना उत्पन्नाची मर्यादा नव्हती, ती आता लागू झाली आहे.

यापूर्वी परदेशी शिष्यवृत्तीच्या लाभार्थींचा संपूर्ण खर्च हा शासनाकडून उचलला जात होता. पण अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आलेल्या जाहिरातीनुसार, आता पदवी आणि पदविका अभ्यासक्रमासाठी वार्षिक ३० लाख, तर पीएच.डी.साठी ४० लाख रुपयांची मर्यादा घा–लून देण्यात आली होती. यापूर्वी विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क वगळून वार्षिक १२ लाख रुपये निर्वाह भत्ता दिला जात होता, परंतु आता ३० आणि ४० लाखांमध्येच निर्वाह भत्ताही मोजला जाईल. पूर्वी एका कुटुंबातील दोन विद्यार्थी परदेशी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊ शकत होते. आता केवळ एक विद्यार्थीच लाभ घेऊ शकणार होता. या सर्व गोष्टी शासनाने मागे घेतल्या असून परदेशी शिष्यवृत्ती ही पूर्वीप्रमाणे सुरू राहणार आहे. यात केवळ आठ लाख उत्पन्न मर्यादेची अट कायम ठेवण्यात आली आहे.

शैक्षणिक अर्हता– परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणासहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. परदे–शातील शैक्षणिक संस्थेने निवड पत्रामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फ्फ्री ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी असे नमूद आहे.

# गरज १०१ शिक्षकांची अनब मिळाले फक्त १७

## नवीन शिक्षकांची सालेकसाकडे पाठ

**१०१ शिक्षकांची गरज असताना फक्त १७ शिक्षक मिळाले आहेत याची मुख्य कारण म्हणजे सालेकसा तालुका हा नक्षलग्रस्त अतिदुर्ग भाग असलेला तालुका असून या तालुक्यात कोणीही कर्मचारी स्वखुशीने रुजू होण्यास तयार नसतो. शिक्षकांच्या बाबतीत तसेच घडत असून नवीन आलेल्या शिक्षकांनी सोयीच्या ठरणाऱ्या गोंदिया तालुका तिरोडा तालुका आणि इतर सोयीस्कर तालुक्यांना प्रथम पसंती देऊन त्या तालुक्यात रुजू झाले आहेत. परंतु सालेकसा कडे पाठ फ्फिरवली आहे. अशात शिक्षणाधिकाऱ्यांनी सालेकसा तालुक्याच्याही गांभीर्याने विचार करून नवीन शिक्षकांना सालेकशा तालुक्यात पाठवून त्यांना रुजू होण्यास भाग पाडले पाहिजे.**

## आठ शाळेत ५६ वर्ग शिक्षक मात्र १८

**सालेकसा तालुक्यात अनेक शाळा असे आहेत की त्या ठिकाणी एक ते सात वर्ग असून सुद्धा एकच शिक्षक दोनच शिक्षक किंवा तीन शिक्षक कार्यरत आहेत त्यामुळे शिक्षकांना प्रत्येक वर्गाला अध्यापन करणे तर दूरच राहिले त्यांना सांभाळणे ही कठीण होत आहे. तालुक्यात निंबा,गल्लाटोला, बाम्हणी आणि पाऊंडदौना या चार शाळा अशा आ–हेत. त्या ठिकाणी एक ते सात पर्यंत फक्त दोन दोन शिक्षक कार्यरत आहेत. हल्बीटोला रामाटोला आणि बाकलसर्रा या ठिकाणी एक ते सात पर्यंत फ्फक्त तीन तीन शिक्षक कार्यरत आहे. पांढरी येथे एक शाळा अशी आहे त्या ठिकाणी एक ते सातवी पर्यंत वर्ग असून सुद्धा एकच शिक्षक कार्यरत आहेत. तालुक्यात अशा एकूण आठ शाळा असे आहेत की त्यांचे एकंदरीत ५६ वर्ग आहेत मात्र त्यामागे फ्फक्त १८ शिक्षक कार्यरत आहेत. सुकाटोला प्राथमिक शाळा अशी आहे की त्या शाळेत आज घडीला एकही शिक्षक कार्यरत नाही आणि उधारीच्या शिक्षकावर चालत आहे. अनेक वेळा शाळा बंद पडली दिसते.**

**गोंदिया :** सालेकसा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकां अभावी शिक्षण कार्य पूर्णतः खोळंबले आहे. तरीसुद्धा गोंदिया जिल्हा परिषदेकडून सालेकसा तालुक्याला नवीन शिक्षक देण्यात दुर्लक्ष करण्यात येत आहे. कारण की नुकतेच गोंदिया जिल्ह्यात नवीन शिक्षक रुजू झाले असून सालेकसा तालुक्याला एकूण १०१ शिक्षकांचे पद रिक्त असताना फ्फक्त १७ नवीन शिक्षक देण्यात आले आहेत .आणि तब्बल ८४ शिक्षकांची नितांत आवश्यकता आहे जर या शिक्षकांची पूर्तता झाली नाही तर खोळंबलेली शिक्षण व्यवस्था आणखी ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सालेकसा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ११२ शाळा आहेत. एकूण दहा केंद्रांच्या विचार केला तर बीजेपार केंद्रात २८ पद मंजूर असून फ्फक्त २१ शिक्षक कार्यरत आहेत आणि सात पद रिक्त आहेत. दरेकसा केंद्रात ३४ शिक्षकांचे पद मंजूर असून २५ शिक्षक आहेत आणि नऊ पदे रिक्त आहेत. झालिया केंद्रात एकूण ४६ शिक्षकांचे पद मंजूर असून ३९ शिक्षक कार्यरत आहेत तर सात पदे रिक्त आहेत.कोटरा केंद्रात २९ शिक्षकांचे पद



मंजूर असून २१ शिक्षक कार्यरत आहेत आणि आठ पद रीक्त आहेत. रामाटोला केंद्रात ४२ शिक्षकांची पद मंजूर असून फक्त २८ शिक्षक कार्यरत आ–हेत तर १४ पद रिक्त पडलेली आहे. रोंढा केंद्रात ४० पदे मंजूर असून ३२ शिक्षक कार्यरत आ–हेत आणि आठ पदे रिक्त आ–हेत. साखरीटोला केंद्रात २४ शिक्षकांचे पद मंजूर आहेत आणि २१ शिक्षक कार्यरत आहेत तीन पदे रिक्त आहेत.

सालेकसा केंद्रात ४३ पदे मंजूर असून ३७ शिक्षक कार्यरत आहेत आणि सहा पदे रिक्त आहेत .सोनपुरी केंद्रात ५६ शिक्षकांचे पद मंजूर असून ४४ शिक्षक कार्यरत आहेत आणि बारा पदे रिक्त आहेत. आणि तिरखेडी केंद्रात ३०शिक्षकांचे पद मंजूर असून २० शिक्षक कार्यरत आहेत आणि दहा पदे रिक्त आहेत असे सालेकसा तालुक्यात एकूण दहा शैक्षणिक केंद्रामध्ये ३७२ शिक्षकांचे पद मंजूर असून फक्त २८८ शिक्षक कार्यरत आहेत तर तब्बल ८४ पद रिक्त आहेत. त्यामुळे सालेकसा तालुक्यात गोरगरीब आदिवासी मागासलेल्या दलित पीडित पालकांच्या पाल्यांना हक्काचे शिक्षण मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. याकडे जिल्हा परिषदेचे अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# डॉ.पारधी व पथकाने केली यशस्वी कर्करोग थायरॉईड शस्त्रक्रिया



**गोंदिया:** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात डॉ. कृपाल पारधी, डॉ. ममता रंगारी, डॉ. तनू केसरवाणी यांच्या पथकाने वणी येथील रहिवासी असलेल्या ५० वर्षीय महिला रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीची कर्करोग थायरॉईड (टोटल थायरॉइडेक्टॉमी) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली.

ही शस्त्रक्रिया डॉ. कुसुमाकर घोरपडे यांच्या प्रेरणेने झाली असून कान, नाक, घसा विभागाचे प्रमुख डॉ. अपूर्व पावडे व डॉ. गौरव अग्रवाल यांच्या मार्गदर्शन केली. तसेच नेस्थेसिया पथकाचे नेतृत्व डॉ.रमेश सुगंध व डॉ. कृणाल बोरकर यांनी केले. कर्करोग थायरॉईड हा एक प्रकारचा कर्करोग आहे जो थायरॉईड ग्रंथीमध्ये विकसित होतो.

थायरॉईड ग्रंथी ही मानेच्या पुढील भागात स्थित एक लहान ग्रंथी आहे जी शरीरातील अनेक महत्त्वपूर्ण कार्ये नियंत्रित करणारे हार्मोन्स तयार करते. ही एक दुर्मिळ स्थिती आहे आणि उपचार कठीण आहे. ही गुंतागुंतीची वैद्यकीय प्रक्रिया आता गोंदियातच करता येणार असल्याचे यावरून दिसून येते.

# आमदाराच्या आईची ऑनलाइन फसवणूक,आरोपी जेरबंद

**गोंदिया:** जिल्ह्यातील तिरोडा–गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय भरतलाल रहांगडाले यांच्या आईच्या खात्यातून ऑनलाइन पद्धतीने १ लाख ८२ हजार ४८ रुपये एका अज्ञात व्यक्तीने आपल्या खात्यात वळते केले. ही घटना तिरोडा तालुक्यातील खमारी येथे घडली. तिरोडा विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या आई डेलनबाई भरतलाल रहांगडाले यांचे तिरोडा येथील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बचत खाते आहे. त्यांच्या खात्यावर अज्ञात व्यक्तीने ७४४१०१७५७० हा मोबाईल क्रमांक सक्रीय करून, युपीआयच्या आधारे खात्यातून ३ ते १६ जुलै दरम्यान १ लाख ८२ हजार ४८ रुपये आपल्या खात्यात वळते केले. आपली फ्फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर आमदाराचे स्वीय सहायक ढोरे यांनी तिरोडा पो–लीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

दरम्यान याप्रकरणी नागपूर येथील रोशन शहारे (२७) या तरुणाला तिरोडा पोलिसांनी बुधवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास नागपूर येथून अटक केली आहे. त्यांनी आपण गुगल पे च्या माध्यमातून हे पैसे आपल्या खात्यात वळते केल्याची कबुली तिरोडा पोलिसांना दिली आहे. पुढील तपास तिरोडा ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमित वानखेडे करत आहेत.

# प्राथमिक आरोग्य केंद्र सोनीच्या रात्रकालीन कँम्पमध्ये ७६ लोकांची ई–केवायसी पुर्ण

**गोंदिया :** जिल्ह्यात सर्व आरोग्य केन्द्रात आरोग्य कर्मचारी, आशा सेविका यांचे मार्फ्फत आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे गोल्डन कार्ड मोफ्फत काढण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी दिली आहे.हे कार्ड काढुन आपले १३५६ आजारावर ५ लाखापर्यंत मोफ्फत उपचाराची सुविधा असलेले गोल्डन कार्ड म्हणजेच आयुष्मान कार्ड काढुन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ.नितीन वानखेडे यांनी केले आहे.

दि.१३ जुलै सायंकाळी ४ ते रात्री ९ दरम्यान रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी च्या आरोग्य पथकाने आयुष्मान कार्ड काढ्ण्यासाठी ई–केवायसी कॅप आयोजित करुन कार्यक्षेत्रातील एवढ्या कमी वेळेत ७६ लोकांची नोंदणी प्रक्रीया पुर्ण केल्याची माहीती प्राथमिक आरोग्य केंद्र सोनीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलदीप बघेले यांनी दिली आहे.सदर ई–केवायसी कॅपमध्ये वैद्यकिय अधिकारी डॉ.शर्मा, आरोग्य सेविका ए.पी.सोनवणे व सी.बी.घासले, आशा सेविका मिनाक्षी साखरे, कांता पारधी व यशोदा भोयर उपस्थित होते.डॉ.कुलदीप बघेले यांचे म ार्गदर्शनाखाली कॅंप यशस्वी झाला.



भारत योजनेंतर्गत शासनाने ५ लाखापर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी आयुष्मान कार्ड तयार करणे अनिवार्य आहे.शासनाने आयुष्मान भारत योजनेची व्याप्ती वाढवल्याने गोरगरिबांना आरोग्यविषयक उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. १३५६ आजारांवर आता मोफ्फत उपचार मिळणार आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि केंद्र सरकारच्या पंतप्रधान आयुष्म ान योजनेचे एकत्रीकरण करुन या योजने अंतर्गत ५ लाखापर्यंत मोफ त उपचाराची सुविधा नागरिकांना मिळणार असल्याने लोकांनी आ–पले आजाराचे कवच गोल्डन कार्ड म्हणजेच आयुष्मान कार्ड काढुन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

भविष्यात आजार होवुन उपचारासाठी बिकट आपत्ती उदभवु नये यासाठी आजच आयुष्मान कार्ड काढुन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी केले आहे. हे कार्ड सीएससी केंद्र, आपले सरकार केंद्र, ग्रामपंचायतीचे सेतु केंद्र, या योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालय, स्वस्त राशन दुकानदार व सद्य स्थितीत आरोग्य विभागामार्फ्फत ई–के.वाय.सी. द्वारे तयार करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

आजार होण्याची वाट न बघता आजच आपले आयुष्मान गोल्डन कार्ड काढुन जबाबदार नागरिक बनुन आपल्या कुटुंबाची काळजी घेण्याबाबत आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्र सोनीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलदिप बघेले यांनी केले आहे.

# विविध मागण्यांसाठी सरपंच करणार मुंबईत आंदोलन

## अखिल भारतीय सरपंच परिषदेचा निर्णय

**गोंदिया:** सरपंच, उपसरपंच तथा ग्राम पंचायत सदस्यांच्या प्रलंबित मागण्या आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्काळ पूर्ण करण्यात याव्यात. या मागणीला घेऊन राज्यभरातील सरपंच, उपसरपंच लवकरच म ुंबईत धडक मोर्चा काढणार आहेत. नागपूर येथील सरपंच परिषदेच्या अधिवेशनात एकमताने हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती अखिल भारतीय सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार यांनी दिली आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने सरपंच भवन नागपूर येथे विदर्भातील सरपंच उपसरपंच यांची बैठक पार पडली. यावेळी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे राज्य सल्लागार प्रा. राजेंद्र कराडे, विदर्भप्रमुख ॲड. देवा पाचभाई, विदर्भ उपाध्यक्ष महेंद्र भांडारकर, विदर्भ सरचिटणीस प्रमोद गमे, विदर्भ संघटक किशोर निंबार्ते, विदर्भ समन्वयक उषाताई काळे, ना–गपूर जिल्हाध्यक्ष सूरज पाटील, गोंदिया जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार, गडचिरोली जिल्हाअध्यक्ष संदीप ठाकूर, भंडारा जिल्हाध्यक्ष शरद इटवले, रत्नाकर चटप, देविदास सातपुते, अरुण रा–गीट, अरुण काळे, भोजराज वैद्य आदि पदाधिकारी प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. या सभेला विदर्भातील शेकडोच्या संख्येने सरपंच उपस्थित होते. दरम्यान सरपंच मानधनात भरीव वाढ करण्यात यावी, तीन लाखाच्या वरील कामे ग्रामपंचायतीला करू न देण्याचा निर्णय तत्काळ रद्द करून ग्राम पंचायतला अधिकार देण्यात यावे, आमदार खासदार यांच्या प्रमाणे सरपंचांना देखील पेन्शन योजना सुरू करावी कारण ते देखील लोकप्रतिनिधी आ–हेत, शासनाने बंद केलेल्या १३ दाखल्याचा आदेश पुन्हा लागु करावा, शासनाच्या कुठल्याही योजनांचा लाभ घेण्यासाठी



घर टॅक्स पावती बंधनकारक करावी, आदी मागण्या विषयी बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी सरपंचांच्या विविध समस्या उपस्थित सरपंचांनी अध्यक्ष समोर मांडल्या. शासन इतर कर्मचाऱ्यांचे मानधनात वाढ करित असताना गावाचा मुख्य घटक असलेल्या सरपंचाकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे सोबतच ग्रामपंचायतींना गावाच्या विकासासाठी देण्यात येणाऱ्या दलित वस्ती, जन सुविधा, ना–गरी सुविधा, तांडा वस्ती, आदि योजनांबाबतही शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सरपंच संघटना मुंबईत धडक देणार आहे. येत्या १७ ते १८ ऑगस्ट दरम्यान मुंबई येथे ग्रामविकास मंत्रालयासमोर सरपंच संघटना आंदोलन करणार असल्याचे यावेळी राज्य सल्लागार राजेश कराडे विदर्भ प्रमुख ॲड. देवा पाचभाई यांनी सांगितले. सदर बैठकीला विदर्भातील सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्ह्यातील सरपंच, उपसरपंच यांनी आंदोलनासाठी सज्ज व्हावे**

**शहरांच्या तुलनेत गावखेड्यांचा विकास, सक्षमीकरण याकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. बजेट मध्ये नेहमी शहरांना झुकते माप देऊन ग्रामीण भारताचा हिरमोड केला जातो. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही. देशाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर आधी खेड्यांना, ग्राम पंचायतींना सक्षम करावं लागेल. आपल्या हक्क व अधिकार रक्षणासाठी तथा ग्रामीण विकासाला पाठबळ देण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक सरपंच उपसरपंच यांनी आंदोलनासाठी सज्ज व्हावे.**

**–चंद्रकुमार बहेकार,**
**जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय सरपंच परिषद गोंदिया.**

# जि.प.अध्यक्ष पकंज रहांगडालेच्या वाढदिवसानिमित्त वह्यांचे वितरण

**गोरेगाव :** आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी क्षेत्रातील चिलाटी, तुमखेडा आणि मोहगाव येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना वही वाटप करुन आपला वाढदिवस साजरा केला. पंकज रहांगडाले यांनी सोशल मिडियावर वाढदिवसाच्या दिवशी हार, फ्फ ुले पुष्पगुच्छ न आणता शालेय साहित्य घेऊन येण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक हितचिंतकांनी त्यांना शालेय साहित्य भेटवस्तू म्हणून दिले ज्याचे वाटप गरजू विद्यार्थ्यांना केले जाणार आहे.



आपल्याकडून विद्यार्थ्यांना भेटवस्तू म्हणून पंकज रहांगडाले यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना वही वाटप केले. यावेळी चिलाटी येथील कार्यक्रमात मनोज बोपचे सभापती पं. स. गोरेगाव, रविन्द्र पटले जिल्हाउपाध्यक्ष युवा मोर्चा गोंदिया, फ्फणिंद्र पटले युवा मोर्चा उपाध्यक्ष, नलिनीबाई बिसेन सरपंच चिल्हाटी, धनराज टेंभरे, विलास पटले उपसरपंच चिल्हाटी, मानसिंग ठाकुर, माणिकभाऊ पारधी, विमलाबाई ठाकुर, रमेश सिलेवार, लालचंद चौहान, भूषण ठाकुर, यशवंत ठाकुर, दिलीप बोपचे, सचिव मॅडम तसेच तुमखेडा येथील कार्यक्रमात सरपंच रंजुकुम ार पालीकराम येळे, ग्राम पंचायत सचिव योगेश रुद्रकार, माजी सरपंच घनश्यामभाऊ पटले, तंटाम ुक्ती अध्यक्ष श्डॉ होमेन्द्र रहांगडाले, ग्राम पंचायत सदस्य उमेशकुमार ठाकुर, प्रमेश्वर प्रधान, माजी तं.मु.अध्यक्ष बाबारावजी बन्स–ोड, माजी त.मु.महेन्द रहांगडाले, माजी ग्राम प.सदस्य मुकेश बेलगे, गिरीश रहांगडाले, सोमेश्वर बोपचे, यशवंत वानखेड़े विजय पटले, सुनील शरणागत, योगेश कुमार शहारे, सर्व आंगनवाड़ी सेविका सर्व महिला बचत गट सी.आर.पी., सर्व आरोग्य सेविका व समस्त गावकरी आणि मोहगाव येथील कार्यक्रमात गेंदलालजी हरिणखेडे, कमलेशजी रहांगडाले, सीताबाई रहांगडाले, गणराजजी पटले, शिक्षक आणि कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.